# महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती

(२०२०-२०२१)

(चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

## मनोधैर्य योजनेबाबत

# पहिला अहवाल

सत्यमेव जयते

(अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनांक २४ मार्च, २०२२ रोजी सादर करण्यात आला.)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
विधान भवन, मुंबई
२०२२

# महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती

(२०२०-२०२१)

(चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

## मनोधैर्य योजनेबाबत

# पहिला अहवाल

# महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती

## (२०२०-२०२१)

**समिती प्रमुख :**

१. श्रीमती सरोज आहिरे, वि.स.स.

**समिती सदस्य**

२. श्रीमती यामिनी यशवंत जाधव, वि.स.स.

३. श्रीमती लता चंद्रकांत सोनवणे, वि.स.स.

४. श्रीमती सुमनताई आर.आर.पाटील, वि.स.स.

५. श्रीमती सुलभा खोडके, वि.स.स.

६. श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.

७. श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स.

८. श्रीमती मोनिका राजळे, वि.स.स.

९. श्रीमती नमिता मुंदडा, वि.स.स.

१०. श्रीमती गिता जैन, वि.स.स.

११. श्रीमती मंजुळा गावीत, वि.स.स.

१२. डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स.

१३. श्री. जयंत आसगावकर, वि.प.स.

१४. श्री. नागोराव गाणार, वि.प.स.

१५. रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. राजेंद्र भागवत, प्रधान सचिव
श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
श्री. विजय कोमटवार, अवर सचिव
श्री. मधुकर भडेकर, कक्ष अधिकारी.

## अनुक्रमणिका



| अ.क्र. (१) | विषय (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| १) | प्रस्तावना | ( सात ) |
| २) | मनोधैर्य योजना | १ ते २० |
| ३) | समितीच्या अभिप्राय व शिफारशी | २० ते २३ |
| ४) | परिशिष्ट-"अ" शासन निर्णय | २५ ते ४७ |
| ५) | परिशिष्ट "ब" बैठकीची उपस्थिती | ४९ ते ५२ |

## प्रस्तावना

मी, महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीची समिती प्रमुख, समितीने आपल्या वतीने अधिकार दिल्यावरुन समितीचा पहिला अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

दिनांक १८ ऑगस्ट, २०२१ रोजी झालेल्या बैठकित राज्यात महिला व बालकांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांसमवेत मनोधैर्य योजनेबाबत सविस्तर माहिती घेण्याचा निर्णय समितीने घेतला व त्याअनुषंगाने सदर योजनेचा उद्देश, योजना कधी सुरु झाली, निकष, लाभार्थी इत्यादीबाबत सविस्तर माहिती पाठविण्याबाबत दिनांक २० ऑगस्ट, २०२१ रोजी महिला व बालविकास विभागास कळविण्यात आले. त्यानुसार मनोधैर्य योजनेबाबत दिनांक २३ ऑगस्ट, २०२१ रोजी माहिती प्राप्त झाली. विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक २५ ऑगस्ट २०२१ रोजी प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग आणि प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग यांची साक्ष घेण्यात आली. विभागाकडून प्राप्त झालेली माहिती व साक्षीच्या वेळी उपलब्ध माहितीचा सखोल विचार करून समितीने आपले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

साक्षीच्या वेळी श्रीमती आय. ए. कुंदन, प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग, श्री. नि. प्र. धोटे, प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग तसेच श्री. राहुल मोरे, आयुक्त, एकात्मिक बाल विकास योजना, श्री. जी. व्ही. देवरे, उपायुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा आयुक्तालय यांनी समितीसमोर उपस्थित राहून समितीस आवश्यक ती माहिती देऊन सहकार्य केल्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

समितीच्या प्रदिर्घकाळ चाललेल्या बैठकीच्या वेळी आपला अमूल्य वेळ देऊन समिती सदस्यांनी ज्या आस्थेने व तत्परतेने हे काम पूर्ण करण्यास सहकार्य दिले त्याबद्दल मी त्यांचे मनःपुर्वक आभार मानते.

समितीने दिनांक २३ मार्च, २०२२ रोजी झालेल्या बैठकीत या अहवालावर विचार करून तो काही सुधारणांसह संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २४ मार्च, २०२२.

**श्रीमती सरोज आहिरे,**
समिती प्रमुख,
महिला व बालकांचे हक्क आणि
कल्याण समिती.

## अहवाल

महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीने महिला व बालकांच्या कल्याणार्थ राबविण्यात येणाऱ्या मनोधैर्य योजनेसंदर्भात व सदर योजना अधिक परिणामकारक करण्याबाबत सविस्तर माहिती घेण्याचा निर्णय घेतला व सदर योजनांच्या अनुषंगाने सविस्तर माहिती मागविण्यात आली. त्यानुसार महिला व बाल विकास विभागाने मनोधैर्य योजनेबाबत खालीलप्रमाणे माहिती सादर केली.

## मनोधैर्य योजना

मा. सर्वोच्च न्यायालयातील Delhi Domestic Working Women's Forum v/s Union of India reported in (1995) 1SCC14, या न्यायप्रकरणात बलात्काराच्या घटनेत बळी पडलेल्या पीडीत महिलेच्या पुनर्वसनासाठी / त्यांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी एक योजना तयार करण्याचे निर्देश जारी केले होते. त्याचप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयातील क्रिमीलर रिट याचिका क्रमांक १२९/२००६ मध्ये देखील मा. सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या दिनांक ११ फेब्रुवारी २०११ च्या आदेशान्वये ॲसिड हल्ल्यात बळी पडलेल्या महिलांना आर्थिक सहाय्य देण्याचे निदेश दिले आहेत. तसेच लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण कायदा, २०१३ (POCSO) च्या तरतूदीनुसार अशा लैंगिक अत्याचारास बळी पडलेल्या बालकांच्या पुनर्वसनाची देखील गरज आहे. उपरोक्त पार्श्वभूमीवर मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्देश, सूचना आणि मार्गदर्शक तत्वांनुसार महाराष्ट्र राज्य शासनाने बलात्कार, बालकांवरील लैगिक अत्याचार तसेच ॲसिड हल्ल्यात बळी पडलेल्या पीडितांच्या पुनर्वसनासाठी राज्यात दिनांक २ ऑक्टोबर २०१३ पासून मनोधैर्य योजना सूरु केली आहे.

२. सदर योजना महाराष्ट्र राज्यात कार्यान्वित करण्यात आली असताना, मा. सर्वोच्च न्यायालयातील Tekaram v/s State of Madhya Pradesh reported in (2016) 4 scc 461 या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिला की, गोवा राज्य शासनामार्फत अशा पीडीत व्यक्तींना रू. १० लाख रूपये नुकसान भरपाई देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे मा. उच्च न्यायालयाने प्रलंबित रिट याचिका क्रमांक - २९५१/२०१६ मध्ये दिनांक ८ मार्च २०१७ च्या आदेशानुसार मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी राज्य शासनास याबाबतीत एक नवीन योजना विकसित करण्याचे निर्देश दिले होते. त्याचप्रमाणे मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट पिटीशन क्र. २१६५/२०१४ व पिटीशन क्र. ३१२३/२०१५ या दोन याचिकांमध्ये मा.उच्च न्यायालयाने राज्यात कार्यान्वीत असलेल्या या मनोधैर्य योजनेअंतर्गतील दिनांक २ ऑक्टोबर २०१३ ही cut-off-date काढण्याचे आदेश देवून सदरची योजना सर्व पीडित महिलांना आणि बालकांना भुतलक्ष्मी प्रभावाने लागू करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

३. वरील सर्व बाबींचा विचार करून राज्य शासनाने दिनांक १ ऑगस्ट, २०१७ च्या शासन निर्णयान्वये उपरोक्त २०१३ च्या मनोधैर्य योजनेत सुधारणा करून राज्यात नवीन सुधारीत मनोधैर्य योजना अंमलात आणली आहे. तथापी उपरोक्त शासन निर्णयास मा. उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्रमांक ८७/२०१७ अन्वये आव्हान देण्यात आलेले आहे.

४. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील क्रिमीनल रिट पिटीशन क्रं. ३५/२०१३ तसेच त्यासोबतच्या अन्य न्यायप्रकरणात मा. मुख्य न्यायमुर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांनी त्यांच्या दि. १२ ऑक्टोबर, २०१७ च्या आदेशानुसार सदर जनहित याचिकेमधील तक्रारींचा आढावा घेऊन बलात्कार, बालकांवरील लैगिक अत्याचार (POCSO) व ॲसिड हल्ल्यात बळी पडलेल्या पीडीतांच्या पुनर्वसानासाठीची एक आदर्श योजना तयार करण्यासाठी मा.न्यायमुर्ती श्रीमती एम.आर.भाटकर, मा.न्यायमुर्ती श्री.जी.एस.कुलकर्णी, ॲडव्होकेट जनरल, मुंबई उच्च न्यायालय व सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय यांची समिती गठित करण्यात आली आहे. यानुसार अनेक स्वयंसेवी संस्थांनी आणि त्यांच्या पक्षकारांनी राज्यशासनाच्या जुन्या व नव्या योजनेसंदर्भातील सूचना/हरकती सदर समितीस सादर केल्या होत्या. सदर सूचना/आक्षेपांचा सर्व दृष्टीकोनातून विचार करून समितीने सर्वकष अशी योजना तयार केली आहे.

वरील पार्श्वभूमीवर शासनाचे दिनांक २१.१०.२०१३ व दिनांक १.८.२०१७ चे आदेश अंशतः अधिक्रमित करून बलात्कार / बालकांवरील लैगिक अत्याचार आणि ॲसिड हल्ल्यात बळी पडलेल्या महिला व बालकांना अर्थसहाय्य व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी खालीलप्रमाणे "सुधारीत नवीन मनोधैर्य योजना" राज्यात दि. ३० डिसेंबर २०१७ पासून कार्यान्वित करण्यात आली.

२. सदर सुधारीत नवीन मनोधैर्य योजना पूर्वलक्षीप्रभावाने लागू राहणार नाही. तथापि, सदर योजना पूर्वीच्या घटनांमध्ये मंजुरीसाठी प्रलंबित असणाऱ्या प्रकरणासाठी लागू राहील. मात्र असे असले तरी :-

(अ) योजनेच्या पुर्वीच्या दि. २१.१०.२०१३ च्या निकषानुसार जिल्हा मंडळाने तपासून अमान्य केलेल्या प्रकरणांच्या बाबतीत त्यांना अशी प्रकरण पुन्हा उघडता येणार नाहीत.

(ब) योजनेच्या पुर्वीच्या दि. २१.१०.२०१३ च्या निकषानुसार अर्थसहाय्य मंजूर करण्यात आलेल्या प्रकरणांमध्ये त्यांना नवीन निकषाप्रमाणे अर्थसहाय्याची वाढीव रक्कम देय होणार नाही. मात्र अर्थसहाय्याव्यतिरिक्त पुर्वीच्या योजनेप्रमाणे देय असणाऱ्या इतर सेवा संबंधित पीडितास नवीन निकषानुसार देखील लागू राहतील.

३. यासंदर्भात मा. उच्च न्यायालयातील रिट याचिका क्र.- २१६५/२०१४ व रिट याचिका क्र.-३१२३/२०१५ मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निदेशानुसार दिनांक ३१.१२.२००९ पासूनच्या पात्र प्रकरणांसाठी सदर मनोधैर्य योजनेच्या पुर्वीच्या दि. २१.१०.२०१३ च्या निकषानुसार भुतलक्षी प्रभावाने अर्थसहाय्य मंजूर करण्याबाबत वेगळ्याने धोरणात्मक निर्णय घेऊन शासनामार्फत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील. तथापि सदरहु सुधारित नवीन मनोधैर्य योजनेअंतर्गत खालील गुन्हयामधील पीडित महिला / बालकांना अर्थसहाय्य देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे.

(१) बलात्कार :- Section ३७५ and ३७६, ३७६ (२), ३७६ (A), ३७६ (B), ३७६ (C), ३७६ (D), ३७६ (E) of the Indian Penal Code (IPC).

(२) बालकांवरील लैगिक अत्याचार :- Section ३, ४, ५ & ६ of Protection of Children from Sexual Offences (POCSO) Act, २०१३.

(३) ॲसिड हल्ला :- Section ३२६A and ३२६B of Indian Penal Code (IPC).

(४) अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम, १९५६ (Immoral Traffic (Prevention) Act १९५६ (PITA) नुसार पोलीस धाडीत अटक करण्यात आलेल्या बलात्कार/ लैंगिक अत्याचार/ ॲसिड हल्ल्याच्या गुन्हयांतील घटनांमधील १८ वर्षांखालील वयोगटातील पीडित अल्पवयीन मुलींचा समावेश आहे.

यासंदर्भात अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम, १९५६ Immoral Traffic (Prevention) Act, १९५६ (PITA) अंतर्गत पोलीस धाडीत अटक करण्यात आलेल्या १८ वर्षांवरील महिलांच्या पुनर्वसनासाठी सद्यःस्थितीत राज्यात केंद्र पुरस्कृत "उज्ज्वला" योजना कार्यान्वीत आहे.

४. सदर नवीन मनोधैर्य योजनेअंतर्गत पीडितांच्या अर्थसहाय्याच्या मागणीचे अर्ज स्विकारण्यापासून ते अर्थसहाय्य मंजुरीचे पुर्ण अधिकार हे संबंधित जिल्हा विधि सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधि सेवा प्राधिकरण यांचे रहातील. ही एक Single Window System असेल.

५. सदर नवीन मनोधैर्य योजनेच्या सोबत जोडलेल्या परिशिष्ठ-अ मधील निकषानुसार पीडितांस अर्थसहाय्य देताना खालीलप्रमाणे कार्यपद्धती अंवलंबिण्यात यावी.

(i) या प्रयोजनासाठी महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्यामार्फत किंवा यथास्थिती राज्य विधि सेवा प्राधिकरण यांच्यामार्फत "Manodhairya Assistance Account" (MAA) नावाने स्वतंत्र बँक खाते उघडण्यात यावे.

(ii) राज्य शासनामार्फत दरवर्षी यासाठी महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण, मुंबई यांना निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

(iii) या प्रयोजनासाठी महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्यामार्फत किंवा यथास्थिती राज्य विधि सेवा प्राधिकरण यांच्यामार्फत उघडण्यात आलेल्या "Manodhairya Assistance Account" (MAA) या स्वतंत्र बँक खात्यामध्ये खाजगी कंपन्यांकडून / संस्थांकडून CSR च्या माध्यमातून देणगीच्या स्वरूपात प्राप्त होणाऱ्या निधीचा समावेश असेल.

(iv) जिल्हा विधि सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधि सेवा प्राधिकरण यासंदर्भातील खालील कागदपत्रांची सत्या-सत्यता तपासल्या शिवाय पीडितास अर्थसहाय्य मंजूर करणार नाही :-

(१) प्रथम खबरी अहवाल (FIR)

(२) अधिकृत शासकीय, निमशासकीय संस्थांमधील वैद्यकीय अधिकाऱ्याने दिलेला प्राथमिक वैद्यकीय अहवाल

(३) मा. न्यायाधीशांसमोर CRPC १६४ अन्वये पीडिताने दिलेला जबाब. **(मात्र गंभीर गुन्ह्यातील घटनांच्या बाबतीत सदर CRPC १६४ अन्वये सादर करावयाच्या पीडिताचा जबाब घेण्यास मुभा देण्याचे अधिकार जिल्हा विधि सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधि सेवा प्राधिकरण यांना असतील).

(v) याअनुषंगाने पीडितास अर्थसहाय्य मंजूर करताना घटनेची सत्यता तपासण्यासाठी अधिकची माहिती / कागदपत्रे तसेच संबंधित अन्य प्राधिकाऱ्यांचे मत मागविण्याचे अधिकार जिल्हा विधि सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधि सेवा प्राधिकरण यांना राहतील.

(vi) पीडिताच्या बाबतीत मागविण्यात आलेल्या माहितीबाबतची गोपनीयता राखण्याची जबाबदारी जिल्हा विधि सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधि सेवा प्राधिकरण यांची राहील.

(vii) पीडितास अर्थसहाय्य मंजूर करताना याबाबतच्या गुन्ह्यासंदर्भातील फौजदारी न्यायप्रकरणातील मा.न्यायालयाचे आदेश / निर्णय इत्यादीचा आधार घेऊन पीडितांस अर्थसहाय्य मंजूर करता येणार नाही.

(viii) तथापि संबधित पीडित महिलेने मा. न्यायाधीशांसमोर दिलेल्या CRPC १६४ च्या जबाबाशी तीने न्यायालयात एकनिष्ठ राहणे अपेक्षित आहे. अन्यथा यासंदर्भात पीडिताने न्यायालयात जाणीवपूर्वक जबाब फिरविल्यास / गुन्हा सिद्ध न झाल्यास / दावा खोटा सिद्ध झाल्यास पीडितास दिलेले अर्थसहाय्य तीच्याकडून प्रचलित जमीन महसुली कायद्याप्रमाणे वसूल करण्यात यावे.

६. सदर नवीन मनोधैर्य योजनेनुसार पीडितांस अर्थसहाय्य मंजूर करण्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे राहील :-

(१) घटनेसंदर्भातील FIR ची प्रत व अन्य कागदपत्रे संबंधित पोलीस तपासणी अधिकारी ई-मेलद्वारे अथवा अन्य माध्यमातून १ तासाच्या आंत संबंधित जिल्हा विधि सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधि सेवा प्राधिकरण तसेच संबंधित जिल्हा महिला विकास अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात येतील.

(२) तद्नंतर संबंधित पीडित महिलेस वैद्यकीय व मानसिक आधार देण्यासाठी गठित करण्यात आलेल्या ट्रॉमा टीममार्फत त्यांना तात्काळ सेवा पुरविण्यात येतील.

(३) जिल्हा विधि सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधि सेवा प्राधिकरण यांच्याकडे कागदपत्रे प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून सात दिवसाच्या आंत पीडितास रु.३० हजार इतकी रक्कम पीडिताच्या वैद्यकीय उपचारासाठी तात्काळ मदत म्हणून मंजूर करण्यात यावी.

(४) तद्नंतर प्रकरणाची सखोल तपासणी करून जिल्हा विधि सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधि सेवा प्राधिकरण १२० दिवसाच्या आत उर्वरित अर्थसहाय्याची रक्कम संबंधित पीडितास मंजूर करेल.

(५) पीडितांस मंजूर करण्यात आलेल्या एकूण रक्कमेपैकी सुरुवातीस तातडीची मदत म्हणून मंजूर करण्यात आलेली रु.३० हजार इतकी रक्कम वजा करून उर्वरित २५% रक्कम पीडितास अथवा पीडिताच्या नातेवाईकास रोखीने अदा करण्यात येईल. तद्नंतर उर्वरित ७५% रक्कम पीडिताच्या नावे जिल्हा विधि सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधि सेवा प्राधिकरण यांच्यामार्फत बँकेत मुदतठेव म्हणून ठेवण्यात येईल व याबाबतच्या पावतीची प्रत सात दिवसाच्या आंत संबंधित पीडितास उपलब्ध करून देण्यात येईल.

(६) सदर योजनेअंतर्गत पीडितास मंजूर करावयाच्या अर्थसहाय्याच्या रक्कमेसाठी तीच्या स्वतःच्या नावे KYC norms असलेले बँक खाते उघडणे बंधनकारक आहे.

(७) पीडित व्यक्ती अज्ञान असेल तर त्याच्या बाबतीत पालकत्व स्विकारणाऱ्या व्यक्तीच्या नावे बँक खाते उघडण्यात यावे.

७. सदर नवीन मनोधैर्य योजनेनुसार पीडितांस द्यावयाच्या अर्थसहाय्याव्यतिरिक्त पीडिताच्या पुनर्वसनासाठी पीडितांस खालील प्रकारच्या सेवा संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्यामार्फत पुरविण्यात याव्यात :-

(१) सदर योजनेअंतर्गत पीडित महिला / बालकास सर्व शासकीय, निमशासकीय, नगरपालिका, महानगरपालिका, खाजगी रुग्णालयात मोफत वैद्यकीय सेवा पुरविण्यात येईल.

(२) सदर दुर्दैवी घटनांमधील HIV / AIDS बाधीत महिलांना / बालकांना आवश्यक त्या सर्व वैद्यकीय सुविधा उपरोक्त शासकीय, निमशासकीय रूगणालयात मोफत पुरविण्यात येतील.

(३) याशिवाय सदर पीडित महिलेस वैद्यकीय व मानसिक आधार देण्यासाठी गठित करण्यात आलेल्या प्रशिक्षित ट्रॉमा टीममार्फत त्यांना समुपदेशन / कायदेशीर इ.सेवा विनामुल्य पुरविण्यात येतील.

(४) तसेच सदर पीडित महिलेस नोकरी / व्यावसायिक प्रशिक्षण देऊन पुनर्वसन करण्यात यावे.

सुधारित मनोधैर्य योजनेअतंर्गत पीडितांना मंजूर करावयाच्या अर्थसहाय्याचा तपशिल.

| अ. क्र. | घटनेची विवरण | अर्थसहाय्य | शेरा |
|---|---|---|---|
| १. | **बलात्कार :-** | | |
| | (अ) घटनेचा परिणाम स्वरुप मानसिक धक्का बसुन महिलेस कायमचे मतिमंदत्व / शारीरिक अपंगत्व आले असेल, तर | रु. १०,००,०००/- पर्यंत | मंजुर रक्कमेपैकी ७५ % रक्कम १० वर्षासाठी पीडिताच्या नावे बँकेत मुदतठेव म्हणुन ठेवण्यात येईल. तर २५ % रक्कमेचा धनादेश पीडितास तात्काळ अदा करण्यात येईल. (यामध्ये वैद्यकीय खर्चासाठी रु.३० हजार इतक्या रक्कमेचा समावेश आहे.) |
| | (आ) सामुहिक बलात्कार व अशा प्रकरणी महिलेस गंभीर व तीव्र स्वरुपाची शारीरिक इजा झाली असेल, तर | रु. १०,००,०००/- पर्यंत | वरीलप्रमाणे |
| | (इ) बलात्काराच्या घटनेमुळे महिलेचा मृत्यु झाल्यास, | | |
| | (१) मयत महिला कुटुंबातील कमावती महिला असेल तर | रु. १०,००,०००/- पर्यंत | वरीलप्रमाणे |
| | (२) मयत झालेली महिला कुटुंबातील कमावती महिला नसेल तर, | रु. १०,००,०००/- पर्यंत | वरीलप्रमाणे |
| | (ई) बलात्काराच्या गुन्ह्यातील अन्य घटनांमधील पीडित महिला असेल तर | रु. ३,००,०००/- पर्यंत | वरीलप्रमाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | **POCSO अंतर्गत बालकांवरील लैगिक अत्याचार :-** | | |
| | (अ) घटनेमध्ये पीडीत बालकास लिंगभेद न करता कायमस्वरुपी मतिमंदत्व किंवा अपंगत्व आल्यास | रु. १०,००,०००/- पर्यत | मंजुर रक्कमेपैकी ७५% रक्कम १० वर्षांसाठी पीडिताच्या नावे बँकेत मुदतठेव म्हणुन ठेवण्यात येईल. तर २५% रक्कमेचा धनादेश पीडितास तात्काळ अदा करण्यात येईल. (यामध्ये वैद्यकीय खर्चासाठी रु. ३० हजार इतक्या रक्कमेचा समावेश आहे.) |
| | (आ) बालकांवरील लैंगिक अत्याचाराच्या गुन्हयातील अन्य घटनांमधील पीडित महिला असेल तर | रु. ३,००,०००/- पर्यत | वरीलप्रमाणे |
| ३. | **ॲसिड हल्ला :-** | | |
| | (अ) घटनेमध्ये पीडीत महिला/ बालकाचा चेहरा विद्रुप झाल्यास, शरीराच्या कोणत्याही दृष्य भागाची हानी झाल्यास, कायमचे अपंगत्व आल्यास | रु. १०,००,०००/- पर्यत | मंजुर रक्कमेपैकी ७५% रक्कम १० वर्षांसाठी पीडिताच्या नावे बँकेत मुदतठेव म्हणुन ठेवण्यात येईल.तर २५% रक्कमेचा धनादेश पीडितास तात्काळ अदा करण्यात येईल. (यामध्ये वैद्यकीय खर्चासाठी रु. ३० हजार इतक्या रक्कमेचा समावेश आहे.) |
| | (आ) ॲसिड हल्ल्याच्या गुन्ह्यातील अन्य घटनांमधील अन्य घटनांमधील पीडीत महिला असेल तर | रु. ३,००,०००/- पर्यत | वरीलप्रमाणे |

प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग व प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग यांची दिनांक २५ ऑगस्ट, २०२१ रोजी साक्ष घेतली. उक्त साक्षीत विभागीय सचिवांकडून खालीलप्रमाणे माहिती देण्यात आली.

समितीने मनोधैर्य योजनेचे स्वरुप काय आहे व सदर योजना केव्हा सुरु झाली ? याबाबत विचारणा केली असता विभागाने खालीलप्रमाणे माहिती दिली.

मनोधैर्य योजना अगोदर विधि व न्याय विभागाकडे नव्हती. ती महिला व बालविकास विभागाकडे होती. आधी ही योजना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राबविली जात होती.

मनोधैर्य योजना जेव्हा सुरु झाली तेव्हा प्रत्येक जिल्हास्तरावर येणाऱ्या प्रकरणांचा निपटारा जिल्हाधिकाऱ्यांच्या स्तरावर होत होता. त्यानंतर ही सर्व प्रकरणे जिल्हास्तरिय विधि सेवा प्राधिकरण व राज्यस्तरिय विधि सेवा प्राधिकरण यांच्याकडे दिली गेली. त्याचे कारण असे असू शकते की, जिल्हास्तरावर कदाचित त्यांनी खूप रँडमली नुकसान भरपाईचे वाटप केले असेल. आता शासनाने असे निर्देश दिलेले आहेत की, ही जी काही प्रकरणे आहेत म्हणजे समजा एखाद्या महिलेवर ॲसिडचा हल्ला झाला तर अशी प्रकरणे राज्यस्तरिय विधि सेवा प्राधिकरण व जिल्हास्तरिय विधि सेवा प्राधिकरण यांनी तपासावीत. त्यामध्ये काही सत्य आढळले तर, संबंधित पिडित महिलेला नुकसानभरपाई दिली जाईल. यामध्ये बलात्कार पिडीत असेल तर त्यांना १० लाख रुपयांपर्यंत आर्थिक मदत मिळू शकते. त्यातील २५ टक्के रक्कम त्यांना लगेच द्यावयाची आहे, कारण त्यांना औषधोपचारासाठी खर्च येत असतो. उर्वरित ७५ टक्के रक्कम १० वर्षांसाठी त्यांच्या नावावर फिक्स डिपॉझिटमध्ये ठेवण्यात येईल, असा निर्णय घेण्यात आला.

यावर समितीने २५ टक्के रक्कम पीडीतेला तात्काळ दिली जाते काय ? अशी विचारणा केला असता, २५ टक्के रक्कम त्यांच्या बँक खात्यावर जमा केली जाते कारण तिला औषधोपचाराची आवश्यकता असते. उर्वरित ७५ टक्के रक्कम १० वर्षांसाठी त्यांच्या नावावर फिक्स डिपॉझिटमध्ये ठेवली जाते. त्यासाठी कालमर्यादा देखील आहे. ७ दिवसांमध्ये संबंधित पीडीतेला २५ टक्के रक्कम मिळाली पाहिजे असेही निर्देश आहेत. त्याची योग्यरितीने अंमलबजावणी होण्याकरिता यामध्ये राज्यस्तरिय विधि सेवा प्राधिकरण व जिल्हास्तरिय विधि सेवा प्राधिकरण यांना समाविष्ट करण्यात आले. कारण ते कायदेशीर बाबी चांगल्या प्रकारे हाताळतात. अशी विभागीय सचिवांनी माहिती दिली असता,

एखाद्या महिलेला अशा घटनेमध्ये खूपच जास्त शारीरिक अपाय पोहोचला असेल व त्यावरील उपचाराकरिता तिला अडीच किंवा पाच लाख इतका खर्च येणार असेल तर, अशा केसेमध्ये नुकसानभरपाई देताना २५ व ७५ टक्क्यांच्या रेशियोचे पालन कशाप्रकारे करण्यात येते? असे समितीने विचारले असता, अशा एखाद्या स्पेसिफिक केसेसबाबत विभाग नुकसान भरपाईची २५ टक्के रक्कम लगेच देण्यात येते. उर्वरित ७५ टक्के रक्कम देण्याबाबतही कालमर्यादा आहे. महिलेला ज्या कालावधीत मदत मिळणे अपेक्षित आहे तो कालावधी निघून जाईल असे यामध्ये होत नाही. ७५ टक्के नुकसान भरपाईची रक्कम देण्याकरिताही

१२० दिवसांची कालमर्यादा आहे. त्यामुळे १२० दिवसांत पीडीतेला १०० टक्के सर्व नुकसान भरपाईची रक्कम मिळणे अपेक्षित आहे. या क्रिमिनल केसेस आहेत. अशा केसेसमध्ये पोलिसांचीही भूमिका असते. ते चौकशी करतात. अशा केसेसमध्ये पीडीतेला प्रथम दिल्या जाणाऱ्या २५ टक्के नुकसान भरपाईकरिता कालमर्यादा आहे. तसेच नंतर दिल्या जाणाऱ्या उर्वरित ७५ टक्के नुकसान भरपाईकरिता देखील कालर्यादा देण्यात आलेली आहे. १२० दिवसांमध्ये चौकशी पूर्ण करून पीडीतेला नुकसान भरपाईची १०० टक्के रक्कम मिळाली पाहिजे, असे निर्देश आहेत. अशी विभागीय सचिवांनी माहिती दिली.

बलात्कार पिडीतेमध्ये नेमके काय विचारात घेतले जाते, कारण काही बलात्काराच्या प्रकरणात क्रुरताही दिसून येते. अशा वेळेस पीडीतेला वैद्यकीय उपचारांकरिता १० लाखांपेक्षा अधिक खर्च येतो. अशा केसेसमधील पीडीतेला १० लाख रुपयांच्या नुकसान भरपाईची काहीच मदत होऊ शकत नाही. अशा केसेसबाबत वेगळा रेशिओ आहे काय? या समितीच्या प्रश्नावर विभागीय सचिवांनी, अशी माहिती दिली की, बलात्कार पिडीता आहे किंवा नाही हे वैद्यकीय तपासणी व पोलिसांच्या अहवालाच्या आधारावरच ठरविले जाते. पोलीस जेव्हा एखाद्या महिलेला बलात्कार पीडीता म्हणून घोषित करतात तेव्हा ते वैद्यकीय तपासणीच्या रिपोर्टच्या आधारावरच केले जाते. वैद्यकीय तपासणीच्या रिपोर्टच्या आधारावर जेव्हा पिडिता रेप कॅटेगरीमध्ये येते तेव्हा शासनाने त्यांच्यासाठी जे काही लाभ निश्चित केलेले आहेत, ते त्यांना दिले जातात. दुसरे असे आहे की, व्हिक्टिम ऑफ अदर ऑफेन्सेस इन रेप अशा प्रकारच्या पीडीतेला ३ लाख रुपयांची नुकसान भरपाई दिली जाते. त्यात देखील २५ टक्के, ७५ टक्के प्रमाणे त्यांच्या खात्यावर पैसे जमा केले जातात. त्यावर व्हिक्टिम ऑफ अदर ऑफेन्सेस इन रेप याला थोडेसे स्पष्ट करु शकाल का ? याबाबत विभागीय सचिवांनी महिलेवर बलात्कार झाला नाही परंतु, मॉलेस्टेशन झाले. त्यांच्या सोबत दुर्व्यवहार करण्यात आला. अशा प्रकारणांमध्ये ३ लाख रुपयांची नुकसान भरपाई दिली जाते. महिलेवर बलात्कार झाला नाही परंतु, अपमान झाला व ते सिद्ध झाले तर पीडीतेला ३ लाख रुपयांची नुकसान भरपाई २५ टक्के, ७५ टक्के प्रमाणे दिली जाते. असे समितीस अवगत केले.

पूर्वी ही नुकसान भरपाई देण्याचे काम समितीकडे होते. ते काम आता विधि व न्याय विभागाकडे देण्याचे कारण काय आहे? You are increasing number of steps to determine and give compensation. तसेच जेव्हा हे काम जिल्हाधिकाऱ्यांकडून केले जात होते तेव्हाच्या प्रलंबित केसेसच्या संख्येत व आताच्या प्रलंबित केसेसच्या संख्येमध्ये मोठी तफावत आहे. त्यामागचे कारण काय आहे? अशी समितीने विचारणा केली असता विभागाने समितीस खालीलप्रमाणे माहिती दिली.

प्रलंबित केसेसच्या संदर्भात निश्चित असे काही सांगता येणार नाही. कारण बरीच प्रकरणे अशी देखील आली होती की, ज्यामध्ये पीडीतेने तिचे प्रकरण मागे घेतले परंतु, पैसे परत दिले नाहीत. प्रथम त्यांनी पैसे घेतले त्यानंतर त्यांच्या सोबत अशी घटना घडल्याबाबत नकार दिला. त्यामुळे थोडासा संशय होता की, कदाचित त्या केसेस चुकीच्याही असू शकतील. अशा केसेसची चांगली छानिनी झाली पाहिजे आणि प्रत्यक्षात गरजू तसेच ज्या महिलांसमवेतत खरोखरच अशी घटना घडलेली आहे, ज्या केसेस बोगस नाहीत अशा महिलांनाच ही मदत मिळावी या हेतूने राज्यस्तरिय विधि सेवा प्राधिकरण व जिल्हास्तरिय विधि सेवा प्राधिकरणाचा समावेश करण्यात आला.

मा.न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे ही योजना राज्यस्तरिय विधि सेवा प्राधिकरण व जिल्हास्तरिय विधि सेवा प्राधिकरण यांच्याकडे वर्ग करण्यात आलेली आहे. त्यामुळे ती पुन्हा जुन्या ठिकाणी वर्ग करावयाची असल्यास आपल्याला पुन्हा विधि व न्याय विभागाचे मत घ्यावे लागेल. विधि व न्याय विभागाकडे पाठविल्यानंतर. विधि व न्याय विभाग देखील हेच मत देईल की, हे न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे झालेले आहे.

जिल्हाधिकाऱ्यांकडे या योजनेची अंमलबजावणी असताना अशा अनेक केसेस माननीय उच्च न्यायालयामध्ये दाखल झाल्या की, नुकसान भरपाई लवकर मिळत नाही किंवा ती मिळण्यात अडचणी येतात. त्या अनुषंगाने माननीय उच्च न्यायालयाने निर्देश दिले. त्यांनी एक समिती नेमली. त्या समितीमध्ये माननीय उच्च न्यायालयाचे दोन न्यायमूर्ती व विभागाच्या प्रधान सचिवांचा समावेश होता. त्यांनी ती योजना तयार केली. त्यानुसार ती योजना विधि व न्याय विभाग किंवा विधि सेवा प्राधिकरणाकडे गेली. अशी विभागीय अधिकाऱ्यांनी समितीला माहिती दिली.

त्यावर समितीने आपले मत व्यक्त करतांना मनोधैर्य योजना विधि व न्याय विभागाकडे वर्ग केली गेलेली आहे, तेव्हापासून प्रलंबित केसेसचा दर खूप वाढलेला आहे. त्यामुळे ज्यांना आपण मनोधैर्य देण्याची आवश्यकता आहे, त्यांच्या मनाचे खच्चीकरण होत आहे, असा आम्हाला फिडबॅक मिळत आहे. मला असे वाटते की, हे आपल्या समोर ठेवणे गरजेचे आहे, त्यावर विचार होणे गरजेचे आहे.

ही योजना पूर्वी प्रमाणे जिल्हा स्तरावर राहिली तर योग्य होईल कारण आता ती इकडे आल्याने त्यामध्ये खूप कालापव्यय होतो. ती महिला अगोदरच तिच्यासोबत दुर्घटना झाल्याने बेचैन झालेली असते त्यात तिला नुकसान भरपाईकरिता ये-जा करावी लागते. ती स्वतः घरात असली तरी, घरातील व्यक्तींनाही नाहक त्रास होत असतो. आपण या योजनेबाबतचे निर्णय पुन्हा जिल्हापातळीवर दिले पुन्हा विभागाकडे ही योजना आली तर जो वेळ जातो व जे मानसिक खच्चीकरण होते तसे होणार नाही. २५ टक्क्यांबाबत ७ दिवसांचा व ७५ टक्क्यांबाबत १२० दिवसांचा कालावधी तर आहेच फक्त त्या पिडितांचा मानसिक ताण कमी व्हावा, हाच एक उद्देश आहे.

तसेच या योजनेची अंमलबजावणी जिल्हास्तरावर होत होती तेव्हाची आकडेवारी व आता प्राधिकरणाकडे ही योजना आल्यांनतरची आकडेवारी विभागाने प्रथम पाहिली पाहिजे. त्यामध्ये काही फरक आहे का हे देखील पाहिले पाहिजे. असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणल्यानंतर विभागीय सचिवांनी असे मत व्यक्त केले. बोगस केसेसकडेही आपल्याला पाहिले पाहिजे. जेव्हा हा निर्णय झाला त्या मागची पार्श्वभूमी अशी होती की, अशा खूप केसेस येऊ लागल्या. पैसे घेतल्यानंतर महिला केस करायच्या मात्र पैसे परत करायच्या नाहीत. त्यामुळे राज्यस्तरीय विधि सेवा प्राधिकरण व जिल्हास्तरीय विधि सेवा प्राधिकरण न्यायालयीन चौकशी करू शकतील याकरिता ही योजना राज्यस्तरिय विधि सेवा प्राधिकरण व जिल्हास्तरिय विधि सेवा प्राधिकरण यांना देण्यात आली होती. आपण सांगत आहात त्याप्रमाणे आपण आम्हाला एक ड्राफ्ट सादर केला तर आम्ही सर्व त्यावर चर्चा करून यामध्ये अजून काही सुधारणा करता येईल ते पाहू. आम्ही हे समजू शकतो की, त्या पीडित महिलेला फायदा मिळाला पाहिजे. तसेच बलात्कार पीडीता असो, ॲसिड ॲटॅक व्हिक्टिम्स असोत त्यांना या मनोधैर्य योजनेंतर्गत नुकसान भरपाई दिली जाते. महिला व बाल विकास विभागाने विधि व न्याय विभागाकडे एक प्रस्ताव पाठविलेला आहे. मनोधैर्य योजनेत ॲसिड हल्ल्यामध्ये जखमी झालेल्या महिलांना नुकसान भरपाई दिली जातेच आहे. याशिवाय कधी कधी **महिलांवर पेट्रोल, डिझेल, रॉकेल, घरगुती गॅसद्वारे देखील हल्ला केला जातो. अशा बऱ्याचशा दुर्घटनांना आत्महत्या म्हटले जाते. परंतु, प्रत्यक्षात अशा प्रकरणात त्या महिलांची नातेवाईकांकडून हत्या केलेली** असते. **त्यामुळे अशा प्रकारे ज्वलनशील व ज्वालाग्राही पदार्थांमुळे होणाऱ्या दुर्घटनांतील पीडितांचा समावेश देखील विभागाकडून मनोधैर्य योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये करण्यात येणार आहे.**

त्यावर समितीने हिंगणघाटची घटना होऊन आता सव्वा वर्ष झाले आहे. मंत्री महोदयांनी तेव्हाच जाहीर केले होते की पेट्रोल डिझेल ॲटॅकचा पण यामध्ये समावेश केला जाईल. या प्रक्रियेमध्ये खूप उशीर होत आहे. खोट्या केसेसचे प्रमाण किती आहे ? १००० केसेसमध्ये १ किंवा २५ बोगस केसेस निघाल्या तर मग आपण हे प्रकरण विधि व न्याय विभागाकडे द्या. तसेच योजना पूर्ण झाली तरी छळवणुकीचे काही नवीन प्रकार पुढे येतात. अशी समितीने पृच्छा केली असता विभागीय सचिवांनी, हिंगणघाटची घटना घडल्यानंतरच बैठक झाली होती. तेव्हाच ताबडतोब विधि व न्याय विभागाकडे नस्ती पाठविण्यात आली होती. यावर लवकरच निर्णय होईल. जिल्हाधिकाऱ्यांकडे कोणत्या प्रकारच्या केस जास्त येतात आणि कोणत्या प्रकारच्या केस कमी येतात हे विभागाला बघायचे आहे. या विषयावर काही अभ्यास करून प्रकरणांचा निपटारा कसा लवकर होईल हे आपल्याला बघावे लागेल. अशी समितीला माहिती दिली.

सन २०१७ पर्यंत किती महिलांना मनोधैर्य योजनेंतर्गत मदत मिळाली आणि सन २०१७ पासून मनोधैर्य योजनेंतर्गत किती महिलांना मदत मिळाली याची वर्षनिहाय आकडेवारी समितीला देण्यात यावी. तसेच महिला व बालकल्याण विकास विभागाकडे डिस्ट्रीब्युशनसाठी जेव्हा मनोधैर्य योजना हस्तांतरित होती त्यानंतर जेव्हा आपल्याकडे योजना आली त्या आकडेवारीची माहिती समितीला देण्यात यावी. त्यातूनच

कळेल जिल्हा पातळीवर पण जिल्हाधिकाऱ्यांकडे खूप कामे असतात त्यामुळे अशी कामे दुर्लक्षित होतात. महिला व बालकल्याण विकास विभाग फक्त याच विषयावर काम करतो त्यामुळे आपण सर्वजण याच विषयावर चर्चा करू. परंतु एखादा विभाग जर फक्त योजनांवरच काम करीत असेल तर आपण त्यांच्याकडूनच संबंधित माहिती घ्यावी. तसेच पेट्रोल, डिझेल, ॲसिड ॲटॅकच्या समावेशाबाबत प्रश्न उपस्थित केला होता. त्या संदर्भातील प्रस्ताव कोणत्या स्तरावर प्रलंबित आहे? याबाबत विचारणा केली असता विभागीय सचिवांनी जिल्हा पातळीवर ओव्हरलोड होतो त्यामुळे बऱ्याच बोगस केस पण दाखल होतात. सर्वच ठिकाणी अशा बोगस केस येतात असे नाही. यामध्ये अशा महिला पण होत्या की, ज्यांनी मनोधैर्य योजनेचा आर्थिक लाभ घेतला आणि नंतर ते विथड्रा किंवा होस्टाईल झाले. अशा प्रकारच्या केस सापडल्यानंतर असा निर्णय घेण्यात आला की, महाराष्ट्र राज्यस्तरीय विधि सेवा प्राधिकरण आणि जिल्हा विधि सेवा प्राधिकरण यांना कायद्याचे ज्ञान आणि त्यांची सिस्टिम रोबस्ट असल्यामुळे त्यांना प्रकरणे फास्ट ट्रॅक करावयास सांगून जेन्युईन प्रकरणांना प्राधान्य द्यावे.

सदर प्रस्ताव विधि व न्याय विभागाकडे प्रलंबित आहे. त्यांच्याकडून प्रस्ताव आल्यानंतर विभागाला शासन निर्णय काढता येईल. विधि व न्याय विभागाला सदर प्रस्तावावर विचार करण्यास किती कालावधी लागेल? अशी समितीने विचारणा केली असता विधि व न्याय विभागाच्या अधिकाऱ्यांनी, लगेच तपासून निर्णय घेण्यात येईल. त्यांना नस्ती क्रमांक कळाल्यास लगेच कार्यवाही करता येईल, असे सांगितले.

त्यावर जर यावर लवकर निर्णय दिला तर मग शासन निर्णय निघेल. त्यामुळे पीडित महिलांना लवकर लाभ मिळेल. बोगस केसेसची छाननी करण्यासाठी प्राधिकरणाकडे काय यंत्रणा आहे ? यामध्ये गृह विभागाची काही मदत होत आहे काय ? अशी समितीने विधि व न्याय विभागास विचारणा केली असता, कोणती कागदपत्रे तपासायची हे शासन निर्णयामध्ये दिलेले आहे. त्यानुसार एफआयआर, मेडिकल रिपोर्ट, पीडिताचे सीआरपीसीच्या कलम १६४ अन्वये नोंदवलेले स्टेटमेंट तपासले जाते. याच आधारे प्रकरणावर निर्णय घेतो. शासन निर्णयाच्या बाहेर जाऊ शकत नाही. न्यायालयाच्या निकालांतर प्रकरण बोगस आहे किंवा नाही हे कळते. अशी विभागाने माहिती दिली.

यासंदर्भात महिला व बालविकास विभागाने बोगस केसबाबत माहिती देताना सांगितले की, एखाद्या महिला आणि पुरुषाचे पूर्वीपासून संबंध असतात. परंतु काही कालावधीनंतर महिला तक्रार करते की पुरुषाने रेप केला. तेव्हा अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये गुन्हा सिद्ध करता येत नाही.

काही प्रकरणे अशी असतात की, १० लाख रुपये मिळणार असल्यामुळे पिडीता व आरोपी दोघे मिळून सहमतीने केस दाखल करतात व नंतर मागे घेतात. लेटेस्ट डायरेक्शनप्रमाणे अनाथ मुलांना हॅन्डओव्हर करण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांकडे आली आहे. त्यामुळे त्यांचे काम अजून वाढले आहे. त्यामुळे यामध्ये ज्या काही चुका असतील त्यात अजून सुधारणा करू.

प्रकरण निकाली काढण्यासाठी वेळ जास्त लागण्याचे कारण सांगताना विधि व न्याय विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, जिल्हा न्यायालयातील समितीमध्ये जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाचे

सचिव, शासनाचे वैद्यकीय अधिकारी आणि एस.पी. असतात. ते सर्वजण महिन्यातून एक बैठक घेतच असतात. मागच्या वर्षी कोव्हिडच्या प्रादुर्भामुळे बैठका झाल्या नसाव्यात. बऱ्याच प्रकरणामध्ये सीआरपीसीच्या कलम १६४ अन्वये स्टेटमेंट नोंदवलेले नसते. त्यामुळे ती केस पुढे जाते. अशा बऱ्याच बाबी असतात. शासन निर्णयानुसार बैठका घेण्यासंदर्भात तरतूद आहे. शासन निर्णयाप्रमाणे कागदपत्रे तपासून फक्त निर्णय द्यायचा असतो.

महिला व बालकल्याण विकास विभागामार्फत महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरणाला ४४ कोटी रुपये दिल्याचा मुद्दा समितीने उपस्थित केला असता विभागाला खर्चाची माहिती प्राप्त झाली आहे. सन २०१८-१९ आणि सन २०१९-२० ची माहिती दिलेली आहे. परंतु सन २०२०-२१ ची माहिती विभागाकडे प्राप्त झालेली नाही असे सांगण्यात आले.

तसेच दिनांक ३१ मार्च, २०२१ पर्यंत १३ कोटी रक्कम शिल्लक होती. यानंतर महिला व बालकल्याण विकास विभागाची मागणी आपल्याकडे आली होती की, दिनांक ३१ मार्चला ती रक्कम प्रर्त्यापित केली. यामध्ये ३० दिवस आणि १२० दिवसांच्या मर्यादा आहेत. ती रक्कम प्रर्त्यापित केल्यानंतर परत त्यामध्ये वेळ झाला त्यामुळे आपण त्यांच्याकडे प्रस्ताव पाठवला की ती रक्कम प्रर्त्यापित करण्याऐवजी MAA Account मध्ये राहिली तर तात्काळ ती वापरता येईल. त्यानंतर पुन्हा डिस्ट्रीब्युट अमाउंट केले तर महाराष्ट्र राज्यस्तरीय विधिी सेवा प्राधिकरणाच्या MAA Account मध्ये साधारणतः ३ कोटीच्या आसपास रक्कम शिल्लक आहे. बाकी पूर्ण राज्यात जिल्हा पातळीवरील MAA Account मध्ये रक्कम डिस्ट्रीब्युट केलेली आहे.

विधि सेवा प्राधिकरणाकडे कोणकोणत्या माध्यमातून प्रकरण दाखल होतात व प्रकरण दाखल झाल्यानंतर प्रकरण निकाली काढण्यासाठी प्रकरण कशा पद्धतीने हाताळण्यात येते व सर्वसाधारणपणे किती कालावधित प्रकरण निकाली काढण्यात येते? प्रकरण दाखल झाल्यानंतर आधी पोलीस केस होते. परंतु प्रकरण निकाली काढताना काय काय प्रक्रिया होते याबाबत विचारणा केली असता, काही प्रकरणांमध्ये जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाकडे परस्पर महिला व बालकल्याण विकास विभागाकडून अर्ज पाठवले जातात. काही प्रकरणांमध्ये पीडिता किंवा त्यांचे नातेवाईक परस्पर अर्ज करतात. तेव्हा आम्ही क्रिमिनल केसची माहिती एसपी ऑफिसकडून मागविण्यात येते. ती माहिती आल्यावर चार्जशिट, सीआरपीसीच्या कलम १६४ अन्वये नोंदवलेले स्टेटमेंट आणि मेडिकल रिपोर्ट तपासले जातात. त्यानंतर त्याबाबत बैठक घेऊन निर्णय घेतला जातो. बऱ्याचवेळा प्राधिकरणाकडे थेट अर्ज देखील येतात.

**ट्रामा टीमचे गठण :** पीडित महिला व बालकांना तातडीने मानसिक आधार मिळण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात प्रशिक्षित ट्रामा टीमचे गठण करण्याचे प्रस्तावित होते. त्याप्रमाणे शासननिर्णय दिनांक २६ ऑगस्ट २०१४ नुसार मनोधैर्य टीमचे गठण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या टीममध्ये प्रामुख्याने पोलीस स्टेशनमधील पोलीस अधिकारी, जिल्हा व तालुका स्तरावरील रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी,

मानसोपचार तज्ज्ञ आणि नर्स, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्या अधिपत्याखालील सर्व संरक्षण अधिकारी, परिवेक्षा अधिकारी, जिल्हा बाल संरक्षक अधिकारी यांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यांच्याबाबतची माहिती संकलित करण्यात आली व त्यांच्यासाठी डीओटीद्वारे प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. सदरची टीम घटना घडल्यावर महिला, बालक अथवा यथास्थिती त्यांच्या कुटुंबियांची तात्काळ भेट घेऊन त्यांना समुपदेशन, मार्गदर्शन, इतर सवलती देण्यासाठी त्यांची मदत करेल. तसेच सदर टीम मधील प्रत्येक स्टाफहोल्डर्स आपापली कामे पार पाडणार आहेत.

ट्रामा टिम बाबतची अंमलबजावणी होते काय ? स्थानिक पातळीवर, जिल्हा तसेच तालुका पातळीवर अशी एखादी टीम आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता, ट्रॉमा टीम आहेत तरी देखील ट्रॉमा टीम कार्यक्षम नाही असे जर समितीला वाटत असेल तर समितीने विभागाला सांगावे, त्याबाबतची माहिती घेण्यात येईल. Trauma team is supposed to be formed in every District. ट्रॉमा टीमचे उद्दिष्ट महिलांना कौन्सिलींग करणे, त्यांना माहिती देणे, त्यांची तक्रार ऐकणे आणि त्यांना शासना सोबत जोडणे हा आहे.

ट्रॉमा टिममध्ये विभागाचे अधिकारी देखील आहेत. समितीला त्यामध्ये काही त्रुटी आढळल्या असल्यास त्याबाबत विभागाला अवगत करावे.

ठाणे जिल्ह्यातील मिरा भाईंदर येथे एका ३ वर्षांच्या मुलीवर अत्याचार झाला. त्या घटनेला आता जवळपास २ वर्षे होत आली तरी ट्रॉमा टिमने तिच्या कुटुंबासमवेत संपर्क देखील साधलेला नाही. त्या केसची माहिती वृत्तपत्रातील बातम्यांमध्ये आली. ते झोपडपट्टीत राहतात. त्यांच्याकडे कुठलीही ट्रॉमा टिम गेलेलीी नाही. ते समिती सदस्य तथा स्थानिक लोकप्रतिनिधींच्या संपर्कात सातत्याने आहेत. अद्यापपर्यंत त्यांना काहीही मदत मिळालेली नाही. त्यांनी सर्वांनी पैसे जमा करून तिचा उपचार केला. तिच्यावर खूप शस्त्रक्रिया कराव्या लागल्या, स्थानिकांनी त्याकरिताचा खर्च केला. त्यांना अद्यापपर्यंत काहीही मदत मिळालेली नाही. दोन वर्षांपूर्वी एका ९ वर्षांच्या मुलीवर सार्वजनिक स्वच्छतागृहात अत्याचार झाला होता. त्यावेळेस स्थानिक लोकप्रतिनिधी तेथे गेले. तिला तिच्या मामाकडे पोहोचवण्याचे काम त्यांनी केले. त्या मुलीला देखील अद्यापपर्यंत काहीही नुकसान भरपाई मिळालेली नाही. ही सर्व उदाहरणे आहेत. ट्रॉमा टीम ही फक्त कागदावरच असल्याचे दिसून येत आहे. या समितीच्या प्रश्नावर महिला व बालविकास विभागाच्या सचिवांनी असे सांगितले की, ग्रामपंचायत स्तरावर, ग्रामीण स्तरावर व्हीसीपीसी असते. या व्हीसीपीसीचे उद्दीष्ट गाव परिसरातील मुलांचे संरक्षण करणे असते. त्यांना अशा घटनेची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी लगेच त्याबाबत त्यांच्या वरिष्ठांना कळविणे अपेक्षित आहे. त्यानंतरची जी प्रक्रिया आहे म्हणजे पीडीतेला रुग्णालयात उपचारार्थ दाखल करणे किंवा तिला नुकसानभरपाई देणे असो, हे सर्व काम करणे ही त्यांची जबाबदारी आहे.

मनोधैर्य योजना चांगली आहे. ही योजना महिला व बाल विकास विभाग तसेच गृह विभाग देखील राबवते. परंतु, आपल्याला ही योजना कन्व्हर्जन्समध्ये करावी लागेल. तसेच या योजनेचा प्रचार थोडा जास्त असणे आवश्यक आहे. तसेच, स्थानिक पातळीवरुन एक सिस्टिम तयार करण्याची देखील आवश्यकता आहे.

**विभाग एक सॉफ्टवेअर तयार करेल. या सॉफ्टवेअरमध्ये आपल्याला मुलीचे नाव देता येणार नाही. त्यामुळे आपण 'लेडी बी' अशा प्रकारचे एक सांकेतिक नाव तिला देऊ. त्या पोर्टलवर सर्व काही दिसू शकेल असे असेल. या सॉफ्टवेअरला एका टेलिफोन नंबरशी लिंकअप करावे, अशी कुठल्याही प्रकारची घटना घडली तर, कृपया १०९८ टेलिफोन नंबरवर संपर्क साधावा असे सांगण्यात येईल. १०९८ टेलिफोन नंबरवर नोंद झालेल्या प्रकरणांची माहिती सिस्टिमवर येईल. आपल्या सिस्टिममध्ये असे प्रकरण आल्यानंतर त्यावर पुढे काय झाले, संबंधितांना नुकसानभरपाई मिळाली की नाही, त्यांची वैद्यकीय तपासणी झाली की नाही हे समजेल. या सर्वांसाठी आपण जर एक कालमर्यादा ठेवली नाही तर आपल्याला पुन्हा अशा प्रकारे एक बैठक घ्यावी लागेल की, अद्याप हे झालेले नाही. त्यामध्ये थोडे प्रोफेशनलिझम येणार नाही. विभागाला हे करता येईल. प्रत्येक प्रकरणामध्ये निर्णय कसा झाला व कालमर्यादा असेल तर तो कालमर्यादेमध्ये झाला किंवा नाही हे समजेल.**

मनोधैर्य योजनेची माहिती प्रत्येक पोलीस स्टेशनला उपलब्ध असते काय? Is it displayed at some place ? यावर सचिवांनी, ही योजना स्ट्रीमलाईन करण्याचीही आवश्यकता आहे. एकाच दृष्टिक्षेपात आपल्याला सर्व माहिती पाहता आली तर आपल्या हे लक्षात येते की, या केसमध्ये आता कोठपर्यंत कारवाई झालेली आहे. लहान मुलींच्या ३-४ केसेस विभागाच्या समोर आल्या होत्या. त्या लहान मुलींना त्यांच्या वडिलांचे नाव सांगायचे नव्हते. त्यांच्यावर बलात्कार झाला होता व तो त्यांच्या वडिलांनीच केला होता. परंतु, त्यांना ती केस विथ्ड्रॉ करावयाची होती. असे खूप गुंतागुंतीचे प्रश्न असतात. परंतु, आपण सांगितल्याप्रमाणे आपण या संदर्भात आपले मत द्यावे. आम्ही आमचे मत देऊ याद्वारे आपल्याला कशा प्रकारे स्ट्रिमलाईन करता येईल. ८० टक्के बलात्कार हे ओळखीच्या व्यक्तींकडून केले जातात.

तथापि समितीने सांगितलेल्या प्रकरणांमध्ये आरोपीला शिक्षा झालेली आहे, त्याचा गुन्हा सिद्ध झालेला आहे. पिडितेचे आईवडील तिच्या सोबत होते. यावर त्या पिडितेवर बलात्कार झाल्याचे सिद्ध झालेले आहे परंतु, तिला काहीही नुकसानभरपाई मिळालेली नाही. अशी प्रकरणे कशा पद्धतीने हाताळण्यात येतात व त्याकरिता किती कालावधी लागतो? त्यावर अधिकाऱ्यांनी असे सांगितले की, हा कालावधी प्रत्येक केस कशी असेल यावर अवलंबून असतो. पुरुष आणि स्त्रीचे संबंध असतील परंतु नंतर वाद झाला असेल तर अशा प्रकरणांमध्ये विभाग १०० टक्के नुकसान भरपाई देत नाही. न्यायालयाच्या निकालावर विभाग अवलंबून असतो. न्यायालयाचा निकाल लागण्यास वेळ लागतो. बाकी तातडीच्या केसेसमध्ये खूप विलंब होतो असे वाटत नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

घटना झाल्यावर, पोलीस स्टेशनला नोंद झाल्यावर लगेच २५ टक्के नुकसानभरपाई दिली जाते. उर्वरित नुकसानभरपाई देण्याकरिता न्यायालयाचा निकाल लागेपर्यंत वाट पाहण्यात येते काय? यावर हे प्रकरणपरत्वे ठरवत असतो, असे विभागाने स्पष्ट केले.

आपण असा उल्लेख केला की, काही व्हिक्टिम डायरेक्ट तुमच्याकडे येतात, याबाबत अधिक सांगावे. ज्यांच्या समवेत गुन्हा घडला, बलात्कार झाला, विनयभंग अशा घटनांमध्ये डायरेक्ट तुमच्याकडे येणारेही आहेत काय ? यावर अधिकाऱ्यांनी असे सांगितले की, मनोधैर्य योजनेत आमचा हस्तक्षेप अपेक्षित आहे.

त्यावर आपण सांगता ते बरोबर आहे. त्यावेळेस विभागाकडून कोणती प्रक्रिया अवलंबण्यात येते? त्यावेळी पोलिसांकडून एफ.आय.आर.ची प्रत घेण्यात येते. त्यानंतर ते प्रकरण बैठकीत घेण्यात येते. याचा अर्थ विभागाचे म्हणणे असे आहे की, ते पोलिसांकडे गेल्यानंतर मग विभागाकडे येतात.

समितीने अशी पृच्छा केली की, संवेदनशील व नाजूक प्रकरणे हाताळताना विधि व न्याय विभागाला शासनाकडून अजून काय अपेक्षित आहे की, ज्याबाबत आम्ही शासनाला असे सांगू शकतो की, अशी सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. यावर केसचे पेपर पाहून विभागाला त्या घटनेबाबतची माहिती समजते. संवेदनशील प्रकरणांमध्ये त्यांना लगेच रिलिफ देतो. त्यात फॅक्च्युअल अ‍ॅस्पेक्ट असतात. जसे की, एफ.आय.आर.ची कागदपत्रे, वैद्यकीय तपासणीचा रिपोर्ट असतो, पिडितेचे वय किती आहे यावर सर्व अवलंबून असते. विभाग शासन निर्णयानुसार काम करत असतो.

इतक्या केसेसमध्ये विलंब का होतो? या समितीच्या प्रश्नावर असा खुलासा करण्यात आला की, एखाद्या केसमध्ये रिपोर्ट प्राप्त झाला नाही तर आम्ही तो मिळण्याची वाट पाहतो.

रिपोर्ट उशिराने मिळणे हा एक अडथळाच आहे. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, जेन्युईन केसेस आपल्याला फास्ट ट्रॅक करावयाच्या आहेत. बोगस केसेस आपल्याला बाजूला ठेवायच्या आहेत. त्यावर आपल्याला काही बोलायचे नाही. सर्वांचेच यावर आपापले मत आहे. विधि व न्याय विभागामार्फत मनोधैर्य योजनेद्वारे नुकसानभरपाई देण्यात येते. त्यावेळेस विभागाला येणाऱ्या अडचणी, शॉर्टफॉल्सची माहिती समितीला द्यावी.

विभाग योजनेप्रमाणे काम करतो. विभागाकडे येणाऱ्या कागदपत्रांवरुन आम्हाला त्या मुलीचे वय किती आहे, त्या केसची संवदेनशीलता कळते.

आपल्याकडे कागदपत्रे आली नाहीत तर तुम्ही त्या कागदपत्रांकरिता किती वेळ वाट पाहणार, त्याला काही कालमर्यादा आहे काय ?

विभाग दर महिन्याला बैठक घेतो.

पुढे समितीने अशी पृच्छा केली की, शिक्षा झाल्यानंतर म्हणजे अपराध सिद्ध झाल्यानंतर जर त्यांना तुमच्या कार्यालयाला त्याची माहिती देणे सक्तीचे केले तर संबंधितांना माहिती मिळेल व मनोधैर्य योजनेचा फायदा जेन्युईन केसेसना मिळेल.

विभागाला वकिलांनीच रेफर केले पाहिजे की, या प्रकरणामध्ये आरोपीला शिक्षा झालेली आहे. त्यामुळे पीडीतेला मनोधैर्य योजनेचा लाभ दिला पाहिजे. यावर अधिकाऱ्यांनी अशी माहिती दिली की, यामध्ये बऱ्याचदा असे होते की, पीडीतेला नुकसानभरपाई द्यावी असा न्यायालयाचा निकाल येतो आणि न्यायालयाचा आदेश झाला की, विभाग पैसे देतो.

९० टक्के केसेसमध्ये पिडिता किंवा तिचे कुटुंबीय ट्रॉमामध्ये असतात. त्यांना मनोधैर्य योजनेबाबतची माहिती नसते. त्यामुळे तुम्हाला खरेच असे वाटत असेल की, या योजनेचा चांगला वापर केला पाहिजे व ती लोकांपर्यंत पोहोचली पाहिजे. ज्या ट्रॉमा टिम आहेत त्यांची ही जबाबदारी आहे. श्रीमंत घरातही अशा केसेस होतात. त्यांना आपल्या पैशांची गरज नसते. परंतु, काही ठिकाणी अशा केसेसमध्ये पैशांची खूप आवश्यकता असते. समितीने दिलेल्या केसमधील पिडितेची आई नोकरी सोडून मुलीसोबत राहिली. त्यामुळे तिचे आर्थिक नुकसान झाले. त्यामुळे या योजनेतून त्यांना पैसे मिळाले तर पुढे त्या मुलीचे शिक्षण तरी होईल. ती ९ वर्षांची मुलगी आहे. अशा केसेसमध्ये ग्राऊंड लेव्हलमधून या गोष्टी आपल्यापर्यंत आल्या पाहिजेत यासाठी आमची सर्व तळमळ चाललेली आहे. ग्राऊंड लेव्हलवरील आपल्या टिमची वर्किंग सिस्टिम बदलावी एवढेच म्हणणे आहे. असे समिती प्रमुखांनी मत व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी एक बाब अशी निदर्शनास आणली की, या योजनेच्या अंमलबजावणीबाबत सर्वांचा उद्देश सारखाच आहे. यामध्ये कुणाचे दुमत असण्याचे काही कारण नाही की, या योजनेच्या सर्व लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळाला पाहिजे. विभागामध्ये काम करताना ते एका चौकटीत करावे लागते.

त्यामध्ये थोड्या तांत्रिक मर्यादा असतात. त्यामुळे विलंब होऊ शकतो. तसेच, बोगस लाभार्थी या बाबीही असतात. या केसेसची संख्या कमी करण्याबाबत, निकाली काढण्याबाबत किंवा एक्स्पेडाईट करण्याबाबतच्या काही प्रश्नांवर बोलले असता माननीय अधिकाऱ्यांनी समितीला असे सांगितले की, शासन निर्णयाच्या कक्षेच्या बाहेर त्यांना काम करता येत नाही. आपण शासन निर्णयामध्ये बदल करु शकतो. आपल्या काही अडचणी असतील तर त्या समितीच्या निदर्शनास आणाव्यात. समिती हे असे माध्यम आहे की, त्या शासन निर्णयामध्ये बोगस लाभार्थ्यांची संख्या कमी करण्यासाठी आपल्याला काही पॅरामिटर्स ॲड करण्याची आवश्यकता भासत असेल तर समिती तशी शिफारस सभागृहाला करु शकते की, या पॅरामिटर्स वाढवाव्यात. जेणेकरुन पुढे जाऊन केसेस बोगस ठरत असतील तर अगोदरच त्या पॅरामिटरवर अडविल्याने त्यावर चेक थोडा जास्त वाढू शकेल.

ही योजना जास्तीत जास्त परिणामकारक कशी होईल आणि योग्य लाभार्थ्यांना त्याचा लाभ कसा मिळेल यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. कारण महाराष्ट्रातील ५० मुलींना, महिलांना मनोधैर्य योजना

काय आहे हे माहीत नाही. स्वतःवर जरी अन्याय, अत्याचार झाला नसला तरी कोणी शेजारची बाई, मैत्रीण किंवा इतर कोणतीही महिला असेल तर आपण त्यांना माहिती सांगू शकू. सामान्य महिलांपर्यंत या सर्व गोष्टी पोहोचल्या पाहिजे. यावर **ही जबाबदारी आपण व्हीसीडीसीला पण देऊ शकतो. पोषण आहारच्या संदर्भातील बैठकीला जेव्हा सर्व महिला येतात तेव्हा या मनोधैर्य योजना काय आहे आणि त्याचा लाभ काय आहे,** they should also promote this scheme. Promotion of the scheme should not only be limited to cities. It should be done at ground-level. **ग्रामपंचायत पातळीवर जेव्हा कोणत्याही प्रकारचे कार्यक्रम घेतले जातात तेव्हा त्या कार्यक्रमांतर्गत आपल्याला त्यांना या योजनेची माहिती द्यावी लागेल.** महिला व बाल विकास विभागाच्या वेबसाईटवर जाऊन पण याची मिळते त्यांना सांगावे लागेल. यातून पण त्यांना समजले नाही तर एका मास्टर ट्रेनरला म्हणजे अंगणवाडी बाईला सांगितले तरी पण त्यांना त्याची माहिती होईल. यावर समितीने अशी सूचना केली की, जेव्हा एखादी केस हाताळता तेव्हा आपल्याला वाटते या केसच्या बाबतीत एखादी सुधारणा करायला पाहिजे पण आपले हात शासन निर्णयाने बांधलेले आहेत. आपल्या मनातील तरतूद जर शासन निर्णयात असली असती तर आपण त्या छोटया मुलीसाठी, महिलेसाठी काहीतरी लाभ देऊ शकला असता. परंतु आपण शासन निर्णयाच्या पलिकडे जाऊन काहीही करु शकत नाही. तर अशा केसेसचा पण काहीतरी अभ्यासाचा भाग आपल्याकडे असेल की, आपल्या मनातील काही बदल शासन निर्णयामध्ये झाले पाहिजे. शासन निर्णयामध्ये काही त्रुटी असतील तर विभागाकडून समितीसमोर मांडावेत. जेणेकरुन त्या शासन निर्णयामध्ये बदल करण्यासाठी समितीला शासनाला शिफारस करता येईल.

एखाद्या जिल्ह्याच्या जसे की, नाशिक जिल्ह्याच्या एसपींना किंवा शहरातील कमिशनरला दर महिन्याला किंवा सहा महिन्याला मनोधैर्य योजनेचे लाभार्थी किती आहेत किंवा अशा केसेस किती झाल्या आहेत हे त्यांना शोधण्यासाठी सांगू शकत नाही का ? कारण आज यांच्याकडे १३ कोटी रुपये शिल्लक आहेत असे तुम्ही म्हणता. योग्य लाभार्थी जर या योजनेतून सुटत असतील तर त्यांच्यापर्यंत हा लाभ देण्यासाठी आपण काही करु शकत नाही काय ? फक्त मनोधैर्य योजनेच्या बाबतीत सीपीकडून महिन्याला अहवाल मागवता येईल काय याचा ही आपण विचार केला पाहिजे. आपल्या राज्यात ३६ जिल्हे आहेत तर त्या जिल्ह्यातून ३६ नस्ती येतील तर त्यामध्ये काही खूप मोठा जथा असेल असे नाही. निवडक असेल तर आपल्याला त्यातून फक्त तपासणी करायची आहे की, मनोधैर्य योजनेसाठी एखाद्या पिडितेचा अर्ज आला नाही किंवा कागदपत्रांची प्रक्रिया पूर्ण झाली नाही तर यासाठी आपणच प्रयत्न करु शकत नाही काय ? कारण शासन जर स्वतःहून पुढे येऊन त्यांची मदत करेल तर यामध्ये काय अडचण आहे ? शासन वर्षाला ४० ते ५० कोटी रुपयांची मोठी तरतूद वर्षाला करीत आहे तर ती तरतूद अखर्चित राहण्यापेक्षा इतरांना त्याचा लाभ मिळाला तर शासनाचे उद्दीष्ट साध्य होईल. यामुळे महिलांवर अन्याय झाला असेल तर पुढे येण्यासाठी महिला हिंमत करतील. यावर विभागीय अधिकाऱ्यांनी माहिती देत असतांना सांगितले की, यामध्ये गृह विभागाचा सहभाग महत्त्वाचा आहे. यात एफआयआर, मेडिकल रिपोर्ट आणि सीआरपीसीच्या कलम १६४ अन्वये नोंदविण्यात आलेले स्टेटमेंट या तीन गोष्टी तर अनिवार्यपणे तपासायला सांगितल्या आहेत. समजा कागदपत्रे आली असतील आणि सीआरपीसीच्या कलम १६४ अन्वये स्टेटमेंट दिले नसेल तर पुढे जाता

येत नाही. या दरम्यान त्यांना कॉल केला तर यामध्ये वेळ वाया जातो. तसेच इतर कागदपत्रे आली आणि मेडिकल रिपोर्ट आला नाही तर परत त्यामध्ये वेळ जातो. मुळात जर त्यांच्याकडून नस्ती क्लियर होऊन आली तर त्याच कारणासाठी जी प्रकरणे राहतात ती निकाली निघतील.

प्रत्येक पोलीस स्टेशनला एक वुमेन सेल पण असते. ही सर्व प्रकरणांची आपण टाईमबाऊंड पद्धतीने माहिती द्या असे वुमेन सेल ला सांगू शकतो. तशी तरतूद आपण शासन निर्णयामध्ये समाविष्ट करु. विभागाला काय अडचणी आहेत हे जर आपण सांगितले तर त्यामध्ये सुधारणा करता येईल.

सदर योजनेंतर्गत गत ३ वर्षात किती तरतूद केली व किती खर्च झाला व किती रक्कम अखर्चित राहिली? दिनांक ३१ मार्च, २०२१ पर्यंत १३ कोटी रुपये शिल्लक होते असे सांगितले आहे तर खर्चित रक्कम किती आहे ?

जवळपास १० कोटी रुपये जिल्हा पातळीवरील ट्रान्सफर करून त्यांच्या विभागामध्ये त्यांना ते पैसे वापरायची मुभा दिलेली आहे. त्यापैकी त्यांनी किती रुपये खर्च केले आहेत याची माहिती त्यांच्याकडून घ्यावी लागेल. प्रलंबित असलेली रक्कम परत शासनाकडे जाते काय ? या प्रश्नावर ती रक्कम Manodhairya Assistance Account ( MAA ) मध्ये असल्यामुळे आतापर्यंत ती रक्कम प्रर्त्यापित करण्यासाठी शासनाचे पत्र आले नाही. पण याच वर्षी ती रक्कम प्रर्त्यापित करण्यासाठी शासनाची दोन पत्रे आली आहेत.

वित्त विभागाचा शासन निर्णय आहे की, दिनांक ३१ मार्च ला सर्व अखर्चित रक्कम आपल्याला सरेंडर करावीच लागते, irrespective of any reason. टेक्निकली ती रक्कम सरेंडर करून मग तुम्हाला घेता येते. या योजनेला त्यातून exempt केले की नाही हे बघावे लागेल नाही तर परत तुम्हाला तांत्रिक अडचणी येणारच आहेत.

सदर रक्कम प्रर्त्यापित करावी लागत असेल तर शासनाने आतापर्यंत कधीच ती रक्कम प्रर्त्यापित करायला सांगितली नाही. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे विभागाला ती रक्कम बीडीएसवर मिळालेली नाही. ती MAA Account ला मिळालेली आहे. शासन निर्णयाप्रमाणे समितीच्या निदेशानुसार ती रक्कम आलेली आहे. शासनाने सन २०१७ पासून आतापर्यंत ती रक्कम प्रर्त्यापित करण्यासाठी कधीही सांगितले नव्हते.

आपण जर ती रक्कम प्रर्त्यापित केली नाही तर रिकन्सीलिएशनमध्ये महालेखाकांराचा आक्षेप येतो. जर तसा आक्षेप येत नसेल तर then that is exempted.

अडचण अशी आहे की, डिस्बर्सल होते किंवा लाभार्थींना जी रक्कम दिली जाते त्याची आकडेवारी महिला व बालकल्याण विभागास भेटत नाही. विधि व न्याय विभागाच्या सचिवांना हे सांगितले होते. तेव्हा असे सांगण्यात आले होते की, you will report only to the Law and Judiciary Department. तर ते तसे नाही आहे. निधी आणि बजेट महिला व बालकल्याण विभागाचे आहे. त्यामुळे महिला व बालकल्याण विकास विभागाला अहवाल देणे गरजेचे आहे. महिला व बालकल्याण

विकास विभाग निधी देतो आणि आम्ही अर्थसंकल्पित करतो. विधि व न्याय विभाग महिला व बालकल्याण विभागाला कधी माहिती पाठवत नाही त्यामुळे हे पैसे कसे खर्च झाले हे त्यांना कळत नाही. यामध्येच आमचे एक वर्ष गेले आहे. महिला व बालकल्याण विभाग हा महत्त्वाचा विभाग आहे. Let's not have ego issues. आपण निश्चितपणे विधि व न्याय विभागाला माहिती द्या पण अर्थसंकल्प तर महिला व बालकल्याण विभाग देत आहे. त्यामुळे कृपया मनोधैर्य योजनेबाबत झालेल्या खर्चाबाबतची माहिती नियमित देण्याबाबत सूचना विभागीय सचिवांनी विधि प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

---

**अभिप्राय व शिफारशी**

(१) समितीने मनोधैर्य योजनेची सखोल तपासणी करण्याचे निश्चित केल्यानंतर समितीस विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने महिला व बालविकास विभागाच्या तसेच विधि व न्याय विभागाच्या विभागीय सचिवांकडून सदर योजनेची व्याप्ती, निकष, महिलांना देण्यात येणारे आर्थिक लाभ, त्यासाठी विभागाकडून करण्यात येणारी कार्यवाही इ.बाबत सविस्तर माहिती घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, मनोधैर्य योजना ही बलात्कार व बालकांवरील लैंगिक अत्याचार आणि ॲसीड हल्ल्यात बळी पडलेल्या महिला व बालकांना अर्थसहाय्य व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी राबविण्यात येते. पिडित महिला व बालकांना देण्यात येत असलेल्या अर्थसहाय्यापैकी ७५ टक्के रक्कम १० वर्षासाठी बँकेत मुदत ठेवीच्या स्वरुपात ठेवण्यात येते व उर्वरित २५ टक्के रक्कम तात्काळ अदा करण्यात येते.

सदर योजना पूर्वी महिला व बालविकास विभागामार्फत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमध्ये प्रकरणपरत्वे निर्णय घेवून राबविण्यात येत होती. मात्र यामध्ये काही प्रकरणा संदर्भात चुकीच्या पद्धतीने कार्यवाही होवून पुरुष व महिलांनी सहमतीने ठेवलेल्या संबंधाप्रकरणी देखील बलात्कार झाल्याचे भासवून शासनाचे पैसे हडपण्याचे काही प्रकार निदर्शनास आले. त्यानंतर मा.न्यायालयाच्या आदेशानुसार सदर योजना राज्य विधि सेवा प्राधिकरण व जिल्हा विधि सेवा प्राधिकरण यांच्याकडून राबविण्यात येत आहे. विधि सेवा प्राधिकरणाकडे सदर योजना वर्ग झाल्यापासून पिडीत महिला व बालकांना अर्थसहाय्य मिळण्यास अत्यंत विलंब होत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. उदाहरणच द्यायचे झाले तर मिरा भाईंदर (जि.ठाणे) येथील बलात्कार पिडितेस शासनाची कोणतीही मदत मिळाली नसल्याचे समितीने विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणून दिले. तसेच औरंगाबाद जिल्ह्यात समितीने माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये दौरा केला त्यावेळी औरंगाबाद जिल्ह्यातील बलात्कार पिडीतेची भेट घेवून सांत्वन केले. बलात्कार पिडीतेचे कुटूंब अत्यंत गरीब व शेतात राहणारे मजूर होते. त्यांना तातडीने मदतीची आवश्यकता होती तसे संबंधित अधिकाऱ्यांना त्यांना मदत करण्याची सूचना करुनही अद्यापही त्या कुटूंबांना मनोधैर्य योजनेचे २५ टक्के अर्थसहाय्य मिळालेले नाही. आर्थिक मदत वेळेत पिडीतांपर्यंत पोहोचली नाही तर त्या मदतीचा काहीही उपयोग होणार नाही. यावरुन ज्या उद्देशासाठी शासनाने योजना तयार केली तो उद्देश साध्य होत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. याबाबत विधि व न्याय विभागाने समितीस अवगत केले की,

जोपर्यंत मा.न्यायालयात निर्णय होत नाही तोपर्यंत पिडीतेस अर्थसहाय्य देण्यात येत नाही. न्यायालयात अनेक खटले प्रलंबित असतात. निर्णय लागण्यास विलंब लागतो व पिडीतेस तातडीने अर्थसहाय्य न मिळाल्यास योजनेचा उद्देश साध्य होत नाही. मनोधैर्य योजनेमध्ये अर्थसहाय्य मिळविण्यासाठी फसवणुकीचे किती प्रकार निदर्शनास आले याबाबत विभागाकडून माहिती समितीस उपलब्ध होवू शकली नाही. तथापि काही केसेस फसवणूकीच्या जरी आढळून आल्या तरी त्यांच्याकडून जमीन महसूल कायद्याप्रमाणे महसूली वसूली (Revenue Recovery) करण्याची तरतूद शासन निर्णयात आहे. त्यामुळे काही फसवणूकीच्या केसेस आढळल्याने ज्यांना खरोखर गरज आहे अशा महिलांना मनोधैर्य योजनेचा फायदा न मिळणे हे देखील योग्य नाही. योजना कोणत्या विभागाकडे वर्ग करावी व कोणी हाताळावी हा विषय दुय्यम आहे. परंतु ज्या उदात्त हेतूने ही योजना सुरु झाली त्याचा लाभ योग्य त्या पिडीतेपर्यंत तातडीने कालबद्ध मुदतीत पोहोचावी याद्दृष्टीने प्रयत्न होणे अत्यंत आवश्यक आहे. परंतु सद्यःस्थितीत केवळ तांत्रिक अडचणींमुळे या योजनेच्या अंमलबजावणीत बाधा निर्माण झालेली आहे ही देखील वस्तुस्थिती आहे. यास्तव पिडीत महिला व बालकांना तातडीने मनोधैर्य योजनेचे अर्थसहाय्य मिळण्यासाठी सदर योजना पूर्वीप्रमाणे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडे वर्ग करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी व तोपर्यंत शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे जिल्हा विधि सेवा प्राधिकरण व राज्य विधि सेवा प्राधिकरणाने सात दिवसाच्या आत २५% रकमेचा धनादेश पिडीतेस अदा करण्यात येईल. त्यामध्ये वैद्यकीय खर्चासाठी रु.३० हजाराचा समावेश असेल व १२० दिवसाच्या आत उर्वरित अर्थसहाय्य पिडीतेस अथवा तिच्या कुटूंबास देण्याबाबत आवश्यक ती सर्व कार्यवाही कालबद्ध पद्धतीने करावी व उपरोक्त प्रकरणी केलेली कार्यवाही महिला व बालविकास विभाग व विधि व न्याय विभागाने समितीस एक महिन्याच्या आत कळवावी अशी समितीची शिफारस आहे.

(२) मनोधैर्य योजनेअंतर्गत बलात्कार, बालकांवरील लैंगिक अत्याचार, ॲसीड हल्ला व अनैतिक व्यापारास प्रतिबंध अधिनियम, १९५९ नुसार पोलीस धाडीत अटक केलेल्या बलात्कार, लैंगिक अत्याचार, ॲसीड हल्ल्याच्या गुन्ह्यातील घटनेमधील १८ वर्षाखालील पिडीत मुलींचा समावेश होतो. तथापि पेट्रोल, डिझेल, रॉकेल, घरगुती गॅसच्या माध्यमातून देखील महिलांवर हल्ला केला जातो. अशा दुर्घटनांना आत्महत्या म्हटले जाते. वास्तविक अशा अनेक प्रकरणात ज्वलनशील व ज्वालाग्रही पदार्थामुळे होणाऱ्या दुर्घटनेतील पिडीत महिलांचा समावेश मनोधैर्य योजनेत करण्यात येणार असल्याचे विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी समितीस सांगितले आहे. विभागाचा उपरोक्त निर्णय योग्य असून या योजनेची व्याप्ती वाढवून तातडीने ज्वलनशील व ज्वालाग्रही पदार्थामुळे झालेल्या दुर्घटनेतील महिलांना मनोधैर्य योजनेचा लाभ देण्याबाबतचा निर्णय लवकरात लवकर घेवून आवश्यक ती कार्यवाही विभागाने करावी व याप्रकरणी केलेली कार्यवाही समितीस तीन महिन्याच्या आत अवगत करावी अशीही समितीची शिफारस आहे.

(३) पीडित महिला व बालकांना तातडीने मानसिक आधार मिळण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात ट्रामा टिमचे गठन करण्यात आले आहे. ट्रामा टिम मध्ये पोलीस अधिकारी जिल्हा तालूका स्तरावरील रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, मानसोपचार तज्ञ, नर्स, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी

यांच्या अधिपत्याखाली संरक्षण अधिकारी, परिविक्षा अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांचा समावेश होतो. सदर टिम घटना घडल्यानंतर महिला अथवा बालक किंवा त्यांच्या कुटूंबियांची तात्काळ भेट घेवून त्यांना समूपदेशन, मार्गदर्शन व अन्य सवलती देण्याबाबत पिडीतेस अथवा त्यांच्या कुटूंबियांस मदत करते. तथापी प्रत्यक्षात ट्रामा टिमचे कार्य पिडीतेना अथवा त्यांच्या कुटूंबियांना मदत करण्याबाबत अत्यंत उदासिनता दिसून येते. समितीने नाशिक येथील एक घटना व मिरा भाईंदर येथील एक घटना विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणून दिली असता ट्रामा टिम अथवा शासनाच्या अन्य कोणत्याही विभागाने त्यांची दखल घेतली नाही व पिडीतेला कोणतेही सहाय्य न मिळण्याचा मुद्दा निदर्शनास आणला असता, विभागीय सचिवांनी उपरोक्त दोन्ही पिडीतेबाबत चौकशी करून त्यांना मदत देण्याचे मान्य केले. तथापि अद्यापपर्यंत त्याबाबत कोणती कार्यवाही केली त्याची माहिती विभागाने समितीस अवगत केलेली नाही. उक्त दोन्ही घटनांबाबत तातडीने कार्यवाही करून पिडीतांना आर्थिक सहाय्य देण्यात यावे. तसेच राज्यातील सर्वच जिल्ह्यातील ट्रामा टिमचे गठन करून यामध्ये शक्यतोवर जास्तीत जास्त महिला सदस्यांचा समावेश असावा व अशाप्रकारे गठीत केलेल्या टिमची माहिती, संबंधित जिल्ह्यात घडलेल्या घटना, किती पिडीतांना ट्रामा टिमने सहाय्य केले व कितींना सहाय्य केले नाही, त्याची कारणे काय, याबाबतच्या सविस्तर माहितीसह ट्रामा टिमचा प्रचार व प्रसार करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी व केलेली कार्यवाही समितीस तीन महिन्याच्या आत अवगत करावी अशीही समितीची शिफारस आहे.

(४) मनोधैर्य योजना ही लैगिंक अत्याचार पिडीत महिला तसेच बालकांसाठी त्यांना मानसिक आधार देवून आर्थिक स्थैर्य देण्यासाठी अत्यंत उपयुक्त योजना आहे. मात्र सदर योजना खऱ्या गरजूंपर्यंत एकतर पोहचत नाही किंवा त्याबाबतची माहिती जनमानसात नाही त्यामुळे पिडीत महिला, बालक अथवा त्यांच्या कुटुंबियांना मनोधैर्य योजनेचा लाभ मिळताना दिसत नाही. तद्वतच मनोधैर्य योजनेचा लाभ किती लाभार्थ्यांना मिळाला, किती प्रलंबित आहेत, प्रकरणपरत्वे कोणती कार्यवाही सुरू आहे, याबाबतची माहितीही तातडीने विभागाला मिळू शकत नाही याचा विचार करून विभागीय सचिवांनी समितीला अवगत करतांना सांगितले की, मनोधैर्य योजनेसंदर्भात एक आज्ञावली (software) तयार करण्यात येत आहे. त्या आज्ञावलीत सर्व माहिती मिळू शकेल. सदर आज्ञावली १०९८ या टेलीफोन नंबरला जोडण्यात येईल जेणेकरून १०९८ वर आलेल्या फोनची आज्ञावलीत आपोआप नोंद होईल व त्या प्रकरणाबाबत पुढे काय कार्यवाही झाली, पिडीतेस आर्थिक सहाय्य मिळाले की नाही, न्यायालयातील प्रकरणाची सद्य:स्थिती इ. सर्व बाबीची माहिती एका क्लिक वर मिळू शकेल. विभागीय सचिवांनी समितीस सांगितलेली उपरोक्त आज्ञावली अतिशय चांगली आहे. त्याबाबत विभागाने तातडीने कार्यवाही करून अज्ञावली तयार करावी. पिडीतेच्या नावाची माहिती उघड होणार नाही व अशाप्रकारे केलेल्या आज्ञावलीमुळे कुठेही पिडीतेची सुरक्षितता, माहितीची गोपनीयता तसेच कोणत्याही अन्यप्रकारे याचा गैरफायदा कुणालाही घेता येणार नाही याबाबत विभागाने दक्षता घ्यावी व त्याद्वारे सर्व प्रकरणाची माहिती मिळेल आणि येणाऱ्या अडचणी तात्काळ निवारण करण्यास मदत होवू शकेल. या संदर्भात विभागाने तात्काळ आज्ञावली तयार करून उपयोगात आणावी व याबाबत केलेली कार्यवाही समितीस तीन महिन्याच्या आत कळविण्यात यावी अशीही समितीची शिफारस आहे.

(५) मनोधैर्य योजनेचा प्रचार व प्रसार झालेला नसल्याने या योजनेबाबत अनेकांना माहिती नाही. अशा घटनांमुळे पिडीता व त्यांचे कुटूंब खचून जाते, त्यांना काही सूचत नाही. सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी यांनाही या योजनेची हवी तशी माहिती नाही, रूग्णालय, पोलीस ठाणे, महिला व बालविकास अधिकारी यांच्याकडूनही म्हणावी तशी तत्परता दाखवली जात नाही याबाबी विचारात घेता, पोलीस ठाण्यात अशा स्वरूपाचा गुन्हा नोंद झाल्यानंतर त्यांनी महिला व बालविकास अधिकारी यांना याबाबत कळविण्याचे बंधन घालण्यात यावे. तसेच महिला व बालविकास अधिकारी यांनी सुद्धा अशी प्रकरणे जिल्ह्यात घडल्यास पिडीतांना मनोधैर्य योजनेची माहिती देवून योजनेचा लाभ मिळवून द्यावा. तसेच या योजनेचा प्रचार व प्रसार करतांना महिला व बालविकास अधिकारी, अंगणवाडी सेवीका, ग्रामपंचायती, नगरपालिका, नगरपंचायती, महानगरपालिका, पोलीस ठाणे, लोकप्रतिनिधी, महिला विषयक कामे करणाऱ्या सामाजिक संघटना यांना या योजनेबाबतची माहिती देण्यात यावी जेणे करून या योजनेची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहचू शकेल व दुर्दैवाने अशा घटना घडल्यास पिडीतांना व त्यांच्या कुटूंबियांना तातडीने मानसिक आधार मिळेल तसेच आर्थिक सहाय्य मिळेल याबाबी विचारात घेता विभागाने यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करावी व केलेली कार्यवाही समितीस तीन महिन्यातअवगत करावी अशीही समितीची शिफारस आहे.

(६) मनोधैर्य योजनेंतर्गत मिळणारी मदत ही वैद्यकीय उपचारासाठी मिळणाऱ्या आर्थिक मदतीपुरता मर्यादित न राहता अशाप्रकारे पिडीत महिलांना आर्थिकदृष्टया सक्षम व स्वावलंबी होण्यासाठी त्यांना शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण वा कौशल्य विकास होणेसाठी व त्यांना त्यांच्या पायावर उभे राहणेसाठी आवश्यक ते प्रयत्न विभागामार्फत करण्यात यावे अशीही समितीची शिफारस आहे. याबाबत केलेली कार्यवाही समितीस तीन महिन्यात कळविण्यात यावी.

# परिशिष्ट - "अ"

बलात्कार (Rape) / बालकांवरील लैंगिक अत्याचार ( Sexual Assault ) व ॲसिड हल्ला ( Acid Attack ) यामध्ये बळी पडलेल्या महिला आणि बालकांना अर्थसहाय्य व पुनर्वसन करण्यासाठी कार्यान्वित असलेल्या "मनोधैर्य योजने" च्या अर्थसहाय्याच्या निकषात सुधारणा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग,
शासन निर्णय क्र.संकीर्ण -२०१६/प्र.क्र.३५ /का-२,
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : १ ऑगस्ट, २०१७.

संदर्भ- १. शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०११ / प्र.क्र. ६/ का-२, दिनांक २१ ऑक्टोबर, २०१३.
२. केंद्रिय महिला व बाल विकास मंत्रालय यांचे अर्धशासकीय पत्र दि. ९.१२.२०१०.
३. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र. २९५१/२०१६ मध्ये दि. ८.३.२०१७ रोजी दिलेले आदेश.

प्रस्तावना:-

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार बलात्कार / बालकांवरील लैंगिक अत्याचार आणि ॲसिड हल्ला यामध्ये बळी पडलेल्या महिला व बालकांना अर्थसहाय्य व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी तत्कालीन मा.मंत्रीमंडळाच्या निर्णयास अनुसरुन महिला व बाल विकास विभागाच्या शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०११/प्र.क्र.६/का-२, दिनांक २१ ऑक्टोबर, २०१३ अन्वये राज्यात "मनोधैर्य योजना" सुरु करण्यात आलेली आहे. मनोधैर्य योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या होण्यासाठी सद्याच्या निकषानुसार क्षेत्रीय स्तरावर येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन या निकषात केंद्र शासनाच्या दिनांक ०९.१२.२०१० च्या अर्धशासकीय पत्रान्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार बदल करण्याचे प्रस्तावित होते.

२. दरम्यानच्या कालावधीत मनोधैर्य योजनेसंदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र.२९५१/२०१६ या प्रकरणामध्ये Criminal Appeal No.८८४ of २०१५ Tekan Alias Tekram V/s the State of Madhya Pradesh मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्देश तसेच गोवा राज्य अशाच योजनेकरीता देत असलेले रु. १०.०० लाख आर्थिक सहाय्य लक्षात घेऊन राज्यातही त्याच धर्तीवर नवीन योजना तयार करण्यात यावी, असे निर्देश मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक ०८.०३.२०१७ च्या आदेशानुसार दिले होते. तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील अन्य दोन रिट याचिका क्र.२१६५/२०१४ व रिट याचिका क्र.३१२३/२०१५ मध्ये देखील मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी मनोधैर्य योजनेअंतर्गत असलेली दिनांक ०२.१०.२०१३ ही Cut-off-date काढून सन २०१३ पूर्वीच्या प्रकरणांत शासनाने ठरविलेल्या निकषाप्रमाणे पात्र प्रकरणांमधील पीडित महिला व बालकांना देखील भूतलक्षी प्रभावाने अर्थसहाय्य देण्यासंदर्भात आदेशीत केले होते. या सर्व बाबी विचारात घेऊन, सध्याच्या "मनोधैर्य" योजनेच्या निकषात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

वरील पार्श्वभूमीवर बलात्कार / बालकांवरील लैंगिक अत्याचार आणि ॲसिड हल्ल्यात बळी पडलेल्या महिला व बालकांना अर्थसहाय्य व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी महिला व बाल विकास विभागामार्फत दिनांक ०२.१०.२०१३ पासून कार्यान्वित असलेल्या मनोधैर्य योजनेच्या निकषात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत: -

१) "मनोधैर्य" योजनेअंतर्गत सदरचे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ नुसार बलात्कार / बालकांवरील लैंगिक अत्याचार आणि ॲसिड हल्ल्यात पीडित महिला व बालकांना सुधारित अर्थसहाय्य देण्यात येईल.

२) "मनोधैर्य" योजनेच्या प्रचलित निकषानुसार अर्थसहाय्य मंजूर करण्यास जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा क्षति सहाय्य व पुनर्वसन मंडळास अधिकार देण्यात आले आहेत. तथापि जिल्हाधिकारी यांच्याकडे असलेला कामाचा व्याप पहाता प्रत्येक प्रकरणात प्रत्येक वेळी बैठका घेणे शक्य होत नाही. परिणामी पीडितांना विहित मुदतीत अर्थसहाय्य देणे शक्य होत नसल्याचे दिसून आले आहे. तरी यापुढे नवीन निकषानुसार पीडितांना मंजूर करावयाचे अर्थसहाय्य जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येत आहेत.

३) "मनोधैर्य" योजनेच्या सोबत जोडलेल्या "परिशिट-अ" मधील नवीन निकषाप्रमाणे पीडितांस अर्थसहाय्य देताना खालीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

**अ) बलात्कार (यामध्ये पीडित मतिमंद महिलांचाही समावेश राहील) :-**

(i) बलात्काराच्या घटनेत सोबतच्या "परिशिष्ट-अ" मध्ये दिलेल्या (१) बलात्कार (अ) व (ब) मधील प्रकरणांत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण यांनी मंजूर केलेल्या अर्थसहाय्यापैकी ७५ % रक्कम १० वर्षासाठी पीडितेच्या नावे बँकेत मुदतठेव म्हणून ठेवण्यात यावी. तर २५% रक्कमेचा धनादेश पीडितेस जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण यांचे आदेशानंतर अदा करण्याची कार्यवाही संबधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी करावी.

अशा प्रकरणांमध्ये पोलीस विभागाकडून जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडे FIR, वैद्यकीय अहवाल आणि CRPC १६४ अन्वये पीडीतेचा जबाब प्राप्त होताच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण तातडीने अर्थसहाय्याबाबत निर्णय घेतील. त्यानुसार कार्यवाही संबधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्याने करावी.

(ii) मनोधैर्य योजनेच्या प्रचलित निकषानुसार अर्थसहाय्य मंजूर करताना क्षेत्रीय स्तरावर असे निदर्शनास आले आहे की, खोटे दावे दाखल होऊन सदर योजनेचे अर्थसहाय्य घेण्याचा प्रयत्न झाला आहे. योजनेच्या सद्याच्या निकषानुसार केवळ प्रथम खबरी अहवाल (FIR) आणि दोषारोपपत्र या आधारे जिल्हा क्षति सहाय्य व पुनर्वसन मंडळाकडून प्रकरण मंजूर करुन संपूर्ण अर्थसहाय्य पीडितास मिळते. तथापि भविष्यात सदर आरोपीविरूध्द पीडित व्यक्तीने साक्ष फिरवल्याने गुन्हा सिध्द न झाल्यास आरोपीची मुक्तता होऊ शकते. त्यामुळे मनोधैर्य योजनेच्या सद्याच्या प्रचलित पध्दतीनुसार अशा प्रकरणांत पीडित महिलेने मा.न्यायालयात दाखल केलेल्या खोट्या दाव्यांमुळे या योजनेचा फायदा संबधित महिला व पुरुष यांना त्यांच्या संगनमताने होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. तरी या प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी बलात्काराच्या घटनेत सोबतच्या "परिशिष्ट-अ" मध्ये

दिलेल्या बलात्कार (१)(क), (ख) व (ड) मधील प्रकरणांसाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

- परिशिष्ट-अ मध्ये दिलेल्या (१) बलात्कार (क), (ख) व (ड) मधील प्रकरणांसाठी पोलीस विभागाकडून जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडे FIR, वैद्यकीय अहवाल आणि CRPC १६४ अन्वये पीडीताचा जबाब प्राप्त होताच रू.२५,०००/- किंवा मंजूर अर्थसहाय्यापैकी २५ % यापैकी जी कमी असेल तेवढी अंतरिम रक्कम देण्याचे आदेश जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण देईल. त्यानुसार कार्यवाही संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्याने करावी.
- अशा प्रकरणी पोलीस विभागाने FIR सोबत CRPC १६४ अन्वये पीडीताच्या जबाबाची प्रत जोडणे अनिवार्य राहील.
- तद्नंतर सदर प्रकरणामध्ये सक्षम न्यायालयात दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण मंजूर केलेल्या रक्कमेपैकी रू. २५,०००/- किंवा मंजूर अर्थसहाय्यापैकी २५ % यापैकी जी कमी असेल तेवढी रक्कम वजा जाता उर्वरित रक्कम अंतिम अर्थसहाय्य म्हणून संबधित पीडितांस अदा करण्याचे आदेश जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण देईल.
- उपरोक्त मंजूर अर्थसहाय्य संबधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी १० वर्षासाठी पीडितेच्या नावे बँकेत मुदतठेव म्हणून ठेवण्याची कार्यवाही करतील.
- बलात्काराच्या घटनेमुळे गंभीर इजा / आजार झालेला असेल, HIV ची लागण झालेली असेल तर, त्यासाठी शासकीय रुग्णालयातून संबधितास मोफत उपचार देण्यात यावेत.
- कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ अंतर्गत मा. न्यायालयाच्या प्रक्रियेनंतर जर महिलेने पतीपासून फारकत/घटस्फोट घेतला असेल आणि तद्नंतर तिच्या पतीकडून बलात्काराची/लैंगिक अत्याचाराची घटना घडल्यास पोलीसांकडील FIR, वैद्यकीय अहवाल आणि CRPC १६४ अन्वये पीडीताचा जबाब प्राप्त होताच रू. २५,०००/- किंवा मंजूर अर्थसहाय्यापैकी २५ % यापैकी जी कमी असेल तेवढी रक्कम पीडितास अंतरिम अर्थसहाय्य देण्यात यावे. तसेच सक्षम न्यायालयात दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर उर्वरित अर्थसहाय्य पीडीताच्या नावे बँकेत मुदतठेव म्हणून रू. १.०० लाख पर्यंतच्या मर्यादेत मंजूर करण्यात यावे.
- तसेच बलात्काराच्या घटनेमुळे मृत्यू आल्यास वारसांना मयत महिला कुटुंबातील कमावती महिला नसेल तर रू.१.०० लाख अर्थसहाय्य आणि जर मयत झालेली महिला कुटुंबातील कमावती महिला असेल तर रू.२.०० लाख अर्थसहाय्य अनुज्ञेय करण्यात यावे. तथापि, ही रक्कम त्यांच्या अल्पवयीन मुलांच्या नावे बँकेत मुदतठेव स्वरुपात ठेवण्यात यावी.

ब) POCSO Act, २०१२ अंतर्गत बालकांवरील लैंगिक अत्याचार (यामध्ये पीडित मतिमंद मुलांचाही समावेश राहील):-

(I) POCSO Act, २०१२ अंतर्गत बालकांवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनेत सोबतच्या "परिशिष्ट-अ" मध्ये दिलेल्या POCSO Act, २०१२ अंतर्गत बालकांवरील लैंगिक अत्याचार (२)(अ) व (ब) मधील प्रकरणांत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण यांनी मंजूर केलेल्या अर्थसहाय्यापैकी ७५ % रक्कम १० वर्षासाठी पीडिताच्या नावे बँकेत मुदतठेव स्वरुप

ठेवण्यात यावी तर २५% रक्कमेचा धनादेश पीडितास अदा करावयाची कार्यवाही संबधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी करावी. तत्पूर्वी यासंबधीचा FIR, वैद्यकीय अहवालाच्या आधारे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण यांची मंजूरी आवश्यक राहील. याबाबत जर कायमचे अपंगत्व असेल तर रू. १० लाखांपर्यन्त अर्थसहाय्य मंजूर करण्यात यावे.

अशा प्रकरणांमध्ये पोलीस विभागाकडून जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडे FIR, वैद्यकीय अहवाल आणि CRPC १६४ अन्वये पीडीताचा जबाब प्राप्त होताच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण तातडीने अर्थसहाय्याबाबत निर्णय घेतील. त्यानुसार कार्यवाही संबधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्याने करावी.

(ब) POCSO Act, २०१२ अंतर्गत बालकांवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनेत सोबतच्या "परिशिष्ट-अ" मध्ये दिलेल्या POCSO Act,२०१२ अंतर्गत बालकांवरील लैंगिक अत्याचार (२) (क) मधील प्रकरणांसाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

- पोलीस विभागाकडून जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडे FIR, वैद्यकीय अहवाल आणि CRPC १६४ अन्वये पीडीताच्या जबाब प्राप्त होताच अंतरिम रू.२५,०००/- किंवा मंजूर अर्थसहाय्यापैकी २५ % यापैकी जी कमी असेल तेवढी रक्कम देण्याचे आदेश जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण देईल. त्यानुसार कार्यवाही संबधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्याने त्वरीत करावी.
- या प्रकरणी पोलीस विभागाने FIR सोबत CRPC १६४ अन्वये पीडीताच्या जबाबाची प्रत जोडणे अनिवार्य राहील.
- तद्नंतर सदर प्रकरणामध्ये सक्षम न्यायालयात दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरणे मंजूर केलेल्या रक्कमेपैकी वरील रू. २५,०००/- किंवा मंजूर अर्थसहाय्यापैकी २५ % यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम वजा जाता उर्वरित रक्कम रु.१.०० लाखाच्या मर्यादेत अंतिम अर्थसहाय्य म्हणून संबधित पीडितांस अदा करण्याचे आदेश जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण देईल.
- उपरोक्त मंजूर अर्थसहाय्यापैकी ७५ % रक्कम संबधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी १० वर्षासाठी पीडितेच्या नावे बँकेत मुदतठेव म्हणून ठेवण्याची कार्यवाही जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या मान्यतेने करील.
- सदरची रक्कम अज्ञान बालकाचे पालक म्हणून बालकाच्या गुन्हयामध्ये सामील नसलेली आई, आई हयात नसेल तर, गुन्हयामध्ये सामील नसलेले वडिल, व आई वडिल दोघेही हयात नसतील तर मा. न्यायालयाने घेतलेल्या निर्णयानुसार बालकाचे पालकत्व किंवा वारसाहक्क असणारी व्यक्ती हया वारस म्हणून राहतील व सदर रक्कम ही बालकाच्या नावे बालक १८ वर्षांचे होईपर्यंत बँकेत मुदत ठेवीच्या स्वरूपात ठेवण्यात येईल. सदरची मुदतठेव ठेवताना ही ठेव बालकाच्या वयाच्या १८ वर्षपर्यंत मोडता येणार नाही, असे बंधन बँकेस घालून देण्यात येईल व मुदतठेव पावतीवरही तसा शेरा मारणे बँकेस बंधनकारक राहील.

- बलात्काराच्या घटनेमुळे मृत्यू झाल्यास, पीडित बालकाच्या कुटुंबामध्ये सामील नसलेल्या आईच्या नावे, आई हयात नसेल तर, कुटुंबामध्ये सामील नसलेल्या वडिलांच्या नावे व आई-वडिल दोघेही हयात नसतील तर मा.न्यायालयाने घेतलेल्या निर्णयानुसार बालकाचे पालकत्व किंवा वारसाहक्क असणाऱ्या व्यक्तीस रक्कम अदा करण्यात येईल.
- बालकांच्या बाबतीत अदा करावयाचे अर्थसहाय्य हे पीडित बालकाच्या कुटुंबामध्ये सामील नसलेल्या आईच्या नावे, आई हयात नसेल तर, कुटुंबामध्ये सामील नसलेल्या वडिलांच्या नावे व आई-वडिल दोघेही हयात नसतील तर मा.न्यायालयाने घेतलेल्या निर्णयानुसार तिचे पालकत्व किंवा वारसा हक्क असणाऱ्या व्यक्तीच्या नावे पहिल्या टप्प्यात १० वर्षांसाठी मुदत ठेव म्हणून ठेवण्यात येईल. ही रक्कम १० वर्ष काढता येणार नाही, असे बँकेस बंधन असेल व तसा शेरा मुदत ठेव पावतीवर नमूद करणे बंधनकारक राहील. १० वर्षानंतर ही ठेव पुन्हा १० वर्षांकरिता Rollover होईल. या रकमेवरील दरमहा येणारे व्याज पालक / वारसा हक्क असणारी व्यक्ती पीडितेच्या पालन पोषणासाठी खर्च करू शकतील.

क) अॅसिड हल्ल्याच्या प्रकरणात पीडितांस द्यावयाच्या अर्थसहाय्याबाबत....

i. अॅसिड हल्ल्याच्या घटनेत सोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये दिलेल्या (३) अॅसिड हल्ला (अ) मधील प्रकरणांत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण यांनी मंजूर केलेल्या अर्थसहाय्यापैकी ५० % रक्कम १० वर्षांसाठी पीडितेच्या नावे बँकेत मुदतठेव म्हणून ठेवण्यात येईल. तर ५०% रकमेचा धनादेश पीडितास अदा करावयाची कार्यवाही संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी त्वरीत करावी. तथापि शासनाच्या गृह विभागाच्या Victim Compensation Scheme, २०१४ मध्ये संबंधित पीडितांस अर्थसहाय्य दिलेले असल्यास त्यास मनोधैर्य योजनेअंतर्गत नुकसान भरपाई अनुज्ञेय असणार नाही.

ii. अॅसिड हल्ल्याच्या घटनेत सोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये दिलेल्या अॅसिड हल्ला (३)(ब) मधील प्रकरणात जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण यांनी मंजूर केलेल्या अर्थसहाय्यापैकी ७५% रक्कम १० वर्षांसाठी पीडितेच्या नावे बँकेत मुदतठेव म्हणून ठेवण्यात येईल.

iii. अॅसिड हल्ल्यात चेहरा विद्रुप झाल्यास करावयाची प्लास्टिक सर्जरी शासनाने निश्चित केलेल्या रुग्णालयात करण्यात यावी व त्यासाठी येणारा पूर्ण खर्च मंजूर करण्याचे आदेश जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण देईल.

ड. मुंबई उच्च न्यायालयातील रिट याचिका क्र.२९६५/२०१४ व रिट याचिका क्र.३१२३/२०१५ मध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी मनोधैर्य योजनेचे अर्थसहाय्य पूर्वलक्षी प्रभावाने देण्याबाबत निदेश दिलेले आहेत. त्यानुसार बलात्काराच्या घटनेमध्ये सोबतच्या विवरणपत्रातील १(अ) व (ब) श्रेणीमधील असणाऱ्या प्रकरणात, POCSO Act, २०१२ अंतर्गत विवरणपत्रातील २(अ) व (ब) व अॅसिड हल्ला प्रकरणात विवरणपत्रातील ३(अ) मधील प्रकरणांसंदर्भात दि. ३१/१२/२००९ पासूनच्या सर्व प्रकरणांसाठी मनोधैर्य योजनेच्या प्रचलित दि. २१ ऑक्टोबर, २०१३ च्या शासन निर्णयातील निकषाप्रमाणे अर्थसहाय्य देण्यात येईल. तथापि घटनेच्या वेळी पोलीस अभिलेख्यात FIR नोंद झाला असेल तरच सदर अर्थसहाय्य देय राहील.

सन २००९ नंतरच्या इतर प्रकरणांचे बाबतीत आतापर्यन्त पीडितांचे पुनर्वसन झालेले असल्याची शक्यता आहे. त्यामुळे सद्यःस्थितीत या पीडीतेच्या बाबतीत तिचा सम्मान करुन तिच्या बाबतीत घडलेल्या पूर्वीच्या घटनेच्या अनुषंगाने तिच्या खाजगी आयुष्यात हस्तक्षेप करणे आता योग्य होणार नाही.

५. "मनोधैर्य" योजनेअंतर्गत जर पीडितास अर्थसहाय्य घ्यावयाचे असेल तर त्यास अन्य कोणत्याही योजनेअंतर्गत अर्थसहाय्य अनुज्ञेय राहणार नाही.

६. मनोधैर्य योजनेची अंमलबजावणी करताना असे दिसून आले आहे की, पीडितांना अर्थसहाय्य देण्यासाठी त्यांच्याकडून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता लवकर होत नाही. त्यामध्ये बराच कालावधी निघून जातो. तसेच संपर्क पत्त्यावर पत्र व्यवहार केला असता, पीडित त्या ठिकाणी उपलब्ध नसल्यामुळे अर्थसहाय्य देणेकरीता अडचणी निर्माण होऊन कार्यवाहीस बराच विलंब होतो. तरी अशा प्रकरणांत या पीडिताचा पत्ता शोधण्यासाठी किंवा कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी कमाल ३ महिन्यांपर्यंत पुरेसा प्रयत्न करुनही पीडित व्यक्तीची कागदपत्रे किंवा पीडित व्यक्ती उपलब्ध न झाल्याची खात्री जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण करेल आणि त्यानंतर अर्थसहाय्याची रक्कम कोषागारात भरण्याचे आदेश करील. त्यानुसार पुढील कार्यवाही संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी करावी.

७. "मनोधैर्य" योजनेअंतर्गत अर्थसहाय्य घेण्यासाठी पीडीतास / पीडिताच्या पालकांना आधार क्रमांक तसेच त्यांच्या आधार संलग्न बँक खात्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरणास सादर करणे आवश्यक राहील. पीडीताचे आधार संलग्न बँक खाते उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी पीडीत व त्याचे पालक यांची राहील.

८. तसेच "मनोधैर्य" योजनेच्या वरील नवीन निकषानुसार पीडित महिलेची वैद्यकीय तपासणी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक-.संकीर्ण-२०१३/प्र.क्र.५५/ आरोग्य-३, दिनांक १०.५.२०१३ अन्वये सादर करण्याचे बंधनकारक राहील.

९. "मनोधैर्य" योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने वर विहीत केलेल्या सुधारित कार्यपध्दतीव्यतिरीक्त इतर कोणतेही नियम लागू होणार नाहीत.

१०. बलात्कार, POCSO Act, २०१२ अंतर्गत बालकांवरील लैंगिक अत्याचार तसेच ॲसिड हल्ल्यात बळी पडलेल्या महिला व बालकांना victim compensation scheme तसेच सुधारित मनोधैर्य योजनेअंतर्गत केवळ एकाच योजनेअंतर्गत अर्थसहाय्य / पुनर्वसन / नुकसान भरपाई अनुज्ञेय राहील.

११. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण यांनी पीडीतास मंजूर केलेल्या अर्थसहाय्याच्या रकमेचा धनादेश पीडीतांना त्यांचे नावे आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात यावा.

१२. या योजनेसाठी येणाऱ्या अनावर्ती रु.१११.८४ कोटी व आवर्ती रु.१८.८० कोटी अशा एकंदरीत रु.१३०.६४ कोटी इतक्या वाढीव खर्चास मा.मंत्रीमंडळाने मान्यता दिलेली आहे.

१३. हा शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग व वित्त विभाग यांचे सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १५९/१७/व्यय ६, दिनांक २६.७.२०१७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१६०८०१११२३३४१६३० असा आहे. सदरचा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Smita Dattatray Nivatkar

( स्मिता निवतकर )
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा.राज्यपाल, यांचे सचिव,राजभवन,मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई .
३) मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ. मुंबई .
४) मा.सभापती/उपसभापती विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ. मुंबई .
५) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा/ विधानपरिषद,महाराष्ट्र विधीमंडळ.
६) मा.मंत्री (म व बा वि)/ राज्यमंत्री (म व बा वि),यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय ,मुंबई
७) मा.मुख्य सचिव यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई.
८) अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
१२) महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई.
१३) सर्व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणे. (आयुक्तांमार्फत)
१४) आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे
१५) आयुक्त, एकात्मिक बाल विकास योजना, नवी मुंबई
१६) सर्व उपसचिव ,सर्व अवर सचिव, महिला व बाल विकास. नवीन प्रशासकीय भवन , मुंबई
१७) उपायुक्त (बालविकास) महिला व बाल विकास आयुक्तालय, म.रा.पुणे.
१८) सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.(आयुक्तांमार्फत)
१९) सर्व जिल्हाधिकारी.
२०) सर्व कार्यासने, महिला व बाल विकास विभाग, नवीन प्रशासकीय भवन , मुंबई
२१) निवड नस्ती का-२.

शासन निर्णय क्र.- संकीर्ण-२०१६/ प्र.क्र. ३५/का-२, दिनांक ०१.०८.२०१७ सोबतचे

परिशिष्ट -अ

मनोधैर्य योजनेच्या नवीन निकषानुसार मंजूर करावयाच्या सुधारित अर्थसहाय्याचा तपशिल

| अ.क्र. | घटनेचे विवरण | अर्थसहाय्य | शेरा |
|---|---|---|---|
| १ | **बलात्कार :-** | | |
| | अ) घटनेचा परिणाम स्वरुप मानसिक धक्का बसून महिलेस कायमचे मतिमंदत्व/ अपंगत्व आले असेल, तर | रु.१०,००,०००/- पर्यन्त | मंजूर अर्थसहाय्यापैकी ७५% रक्कम १० वर्षासाठी पीडिताच्या नावे बँकेत मुदतठेव म्हणून ठेवण्यात येईल. तर २५% रक्कमेचा धनादेश पीडितास जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण यांचे आदेशानंतर देण्यात येईल. |
| | ब) सामुहिक बलात्कार व अशा प्रकरणी महिलेस गंभीर व तीव्र स्वरुपाची शारीरिक इजा झाली असेल, तर | रु.१०,००,०००/- पर्यन्त | वरीलप्रमाणे |
| | क) भूलथापा, फसवणूक लग्नाचे आमिष दाखवून बलात्कार प्रकरणात | रु.१,००,०००/- पर्यन्त | मंजूर अर्थसहाय्यापैकी ७५ % रक्कम मा. न्यायालयात महिलेच्या बाजूने निकाल लागल्यास १० वर्षासाठी पीडितेच्या नावे त्याच्या आधार संलग्न बँक खात्यात मुदतठेव म्हणून ठेवण्यात येईल.<br>मात्र अशा प्रकरणात कोर्टात पीडिताने साक्ष फिरविल्यास / संगनमत केल्यास दिलेली संपूर्ण रक्कम तिच्या कडून वसूल करण्यात येईल |
| | ड) कौटुंबिक हिंसाचार अधिनियम, २००५ नुसार, न्यायालयात फारकत / घटस्फोट झाल्यानंतर पतीकडून महिलेच्या बाबतीत बलात्काराची घटना घडल्यास. | रु.१,००,०००/- पर्यन्त | मंजूर अर्थसहाय्यापैकी ७५ % रक्कम १० वर्षासाठी पीडितेच्या नावे त्याच्या आधार संलग्न बँक खात्यात मुदतठेव म्हणून ठेवण्यात येईल.<br>मात्र अशा प्रकरणात कोर्टात पीडिताने साक्ष फिरविल्यास / संगनमत केल्यास दिलेली संपुर्ण रक्कम तिच्या कडून वसुल करण्यात येईल |

बलात्कार (Rape) / बालकांवरील लैंगिक अत्याचार ( Sexual Assault ) व ॲसिड हल्ला ( Acid Attack ) यामध्ये बळी पडलेल्या महिला आणि बालकांना अर्थसहाय्य व पुनर्वसन करण्यासाठी राज्यात सुधारित "मनोधैर्य योजना" कार्यान्वीत करण्याबाबत......

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण -२०१७/प्र.क्र. २९१/का-२,**
**नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : ३० डिसेंबर, २०१७.**

**संदर्भ-** १. शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०११/प्र.क्र.६/ का-२, दिनांक २१ ऑक्टोबर, २०१३.
२. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र. २९५१/२०१६ मध्ये दि. ८.३.२०१७ रोजी दिलेले आदेश.
३. शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र. ३५/ का-२, दिनांक १ ऑगस्ट, २०१७.

**प्रस्तावना-**

मा. सर्वोच्च न्यायालयातील Delhi Domestic Working Women's Forum v/s Union of India reported in (1995) 1SCC14, या न्यायप्रकरणात बलात्काराच्या घटनेत बळी पडलेल्या पीडित महिलेच्या पुनर्वसनासाठी / त्यांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी एक योजना तयार करण्याचे निर्देश जारी केले होते.. त्याचप्रमाणे मा.सर्वोच्च न्यायालयातील लक्ष्मी विरुद्ध रिट याचिका क्रमांक १२९/२००६ मध्ये देखील मा. सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या दि.१९ फेब्रुवारी २०१५ च्या आदेशान्वये ॲसिड हल्ल्यात बळी पडलेल्या महिलांना आर्थिक सहाय्य देण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण कायदा, २०१२ (POCSO) च्या तरतुदीनुसार अशा लैंगिक अत्याचारास बळी पडलेल्या बालकांच्या पुनर्वसनाची देखील तरतूद आहे. उपरोक्त पार्श्वभूमीवर मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्देश, सूचना आणि मार्गदर्शक तत्वांनुसार महाराष्ट्र राज्य शासनाने बलात्कार, बालकांवरील लैंगिक अत्याचार तसेच ॲसिड हल्ल्यात बळी पडलेल्या पीडितांच्या पुनर्वसनासाठी राज्यात दिनांक २ ऑक्टोबर २०१३ पासून मनोधैर्य योजना सुरू केली आहे.

२. सदर योजना महाराष्ट्र राज्यात कार्यान्वित करण्यात आली असताना, मा. सर्वोच्च न्यायालयातील Tekaram v/s State of Madhya Pradesh reported in (२०१६) ४ SCC ४६१ या न्यायप्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिला की, गोवा राज्य शासनामार्फत ५२१ पीडित व्यक्तींना रु १० लाख रुपये नुकसान भरपाई देण्यात आली आहे त्याचप्रमाणे मा. उच्च न्यायालयाने प्रलंबित रिट याचिका क्रमांक -२९५१/२०१६ मध्ये दिनांक ८.३.२०१७ च्या आदेशानुसार मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी राज्य शासनास धर्तीवर एक नवीन

योजना विकसित करण्याचे निदेश दिले होते. त्याचप्रमाणे मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट पिटीशन क्र- २१६५/२०१४ व पिटीशन क्र -३१२३/२०१५ या दोन याचिकांमध्ये मा.उच्च न्यायालयाने राज्यात कार्यान्वीत असलेल्या या मनोधैर्य योजनेअंतर्गतील दिनांक २.१०.२०१३ ही cut-off date काढण्याचे आदेश देवून सदरची योजना सर्व पीडित महिलांना आणि बालकांना भुतलक्षी प्रभावाने लागू करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

३. वरील सर्व बाबींचा विचार करून राज्य शासनाने दिनाक १ ऑगस्ट, २०१७ च्या शासन निर्णयान्वये उपरोक्त २०१३ च्या मनोधैर्य योजनेत सुधारणा करून राज्यात नवीन सुधारित मनोधैर्य योजना अंमलात आणली आहे. तथापि उपरोक्त शासन निर्णयास मा. उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्रमांक ८७/२०१७ अन्वये आव्हान देण्यात आलेले आहे.

४. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील क्रिमीनल रिट पिटीशन क्र. ३५ /२०१३ तसेच त्यासोबतच्या अन्य न्यायप्रकरणांत मा. मुख्य न्यायमुर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांनी त्यांच्या दि. १२ ऑक्टोंबर, २०१७ च्या आदेशानुसार सदर जनहित याचिकेमधील तक्रारींचा आढावा घेवून बलात्कार, बालकांवरील लैंगिक अत्याचार (POCSO) व ॲसिड हल्ल्यात बळी पडलेल्या पीडितांच्या पुनर्वसनासाठीची एक आदर्श योजना तयार करण्यासाठी मा. न्यायमुर्ती श्रीमती एन.आर.भाटकर,मा. न्यायमुर्ती श्री.जी.एस.कुलकर्णी, ॲडव्होकेट जनरल, मुंबई उच्च न्यायालय व सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय यांची समिति गठीत करण्यात आली आहे. यानुसार अनेक स्वयंसेवी संस्थांनी आणि त्यांच्या पक्षकारांनी राज्यशासनाच्या जुन्या व नव्या योजनेसंदर्भातील सूचना / हरकती सदर समितीस सादर केल्या होत्या. सदर सूचना / आक्षेपांचा सर्व दृष्टीकोनातून विचार करून वरील समितीने सर्वकष अशी योजना तयार केली आहे.

**शासन निर्णय :**

वरील पार्श्वभूमीवर शासनाचे संदर्भाधीन दिनांक २१.१०.२०१३ व दिनांक १.८.२०१७ चे आदेश अंशत: अधिक्रमित करून बलात्कार / बालकांवरील लैंगिक अत्याचार आणि ॲसिड हल्ल्यात बळी पडलेल्या महिला व बालकांना अर्थसहाय्य व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी खालीलप्रमाणे "सुधारित नवीन मनोधैर्य योजना" राज्यात या आदेशाच्या दिनांकापासून कार्यान्वीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर सुधारित नवीन मनोधैर्य योजना पूर्वलक्षीप्रभावाने लागू राहणार नाही.तथापि, सदर योजना पूर्वीच्या घटनांमध्ये मंजूरीसाठी प्रलंबित असणाऱ्या प्रकरणासाठी लागू राहील. मात्र असे असले तरी :-

अ) योजनेच्या पुर्वीच्या दि. २१.१०.२०१३ च्या निकषानुसार जिल्हा मंडळाने तपासून अमान्य केलेल्या प्रकरणांच्या बाबतीत त्यांना अशी प्रकरण पुन्हा: उघडता येणार नाहीत.

ब ) योजनेच्या पुर्वीच्या दि. २१.१०.२०१३ च्या निकषानुसार अर्थसहाय्य मंजूर करण्यात आलेल्या प्रकरणांमध्ये त्यांना नवीन निकषाप्रमाणे अर्थसहाय्याची वाढीव रक्कम देय होणार नाही. मात्र अर्थसहाय्या व्यतिरीक्त पुर्वीच्या योजनप्रमाणे देय असणाऱ्या इतर सेवा संबधीत पीडितास नवीन निकषानुसार देखील लागू राहतील.

योजना विकसित करण्याचे निदेश दिले होते. त्याप्रमाणे मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट पिटीशन क्र- २१६५/२०१४ व पिटीशन क्र -३१२३/२०१५ या दोन याचिकांमध्ये मा.उच्च न्यायालयाने राज्यात कार्यान्वीत असलेल्या या मनोधैर्य योजनेअंतर्गतील दिनांक २.१०.२०१३ ही cut-off date काढण्याचे आदेश देवून सदरची योजना सर्व पीडित महिलांना आणि बालकांना भुतलक्षी प्रभावाने लागू करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

३. वरील सर्व बाबींचा विचार करून राज्य शासनाने दिनांक १ ऑगस्ट, २०१७ च्या शासन निर्णयान्वये उपरोक्त २०१३ च्या मनोधैर्य योजनेत सुधारणा करून राज्यात नवीन सुधारित मनोधैर्य योजना अंमलात आणली आहे. तथापि उपरोक्त शासन निर्णयास मा. उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्रमांक ८७/२०१७ अन्वये आव्हान देण्यात आलेले आहे.

४. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील क्रिमीनल रिट पिटीशन क्र. ३५ /२०१३ तसेच त्यासोबतच्या अन्य न्यायप्रकरणांत मा. मुख्य न्यायमुर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांनी त्यांच्या दि. १२ ऑक्टोंबर, २०१७ च्या आदेशानुसार सदर जनहित याचिकेमधील तक्रारींचा आढावा घेवून बलात्कार, बालकांवरील लैंगिक अत्याचार (POCSO) व ॲसिड हल्ल्यात बळी पडलेल्या पीडितांच्या पुनर्वसनासाठीची एक आदर्श योजना तयार करण्यासाठी मा. न्यायमुर्ती श्रीमती एम.आर.भाटकर,मा. न्यायमुर्ती श्री.जी.एस.कुलकर्णी, ॲडव्होकेट जनरल, मुंबई उच्च न्यायालय व सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय यांची समिती गठीत करण्यात आली आहे. यानुसार अनेक स्वयंसेवी संस्थांनी आणि त्यांच्या पक्षकारांनी राज्यशासनाच्या जुन्या व नव्या योजनेसंदर्भातील सूचना / हरकती सदर समितीस सादर केल्या होत्या. सदर सूचना / आक्षेपांचा सर्व दृष्टीकोनातून विचार करून वरील समितीने सर्वंकष अशी योजना तयार केली आहे.

**शासन निर्णय :**

वरील पार्श्वभूमीवर शासनाचे संदर्भाधीन दिनांक २१.१०.२०१३ व दिनांक १.८.२०१७ चे आदेश अंशत: अधिक्रमित करून बलात्कार / बालकांवरील लैंगिक अत्याचार आणि ॲसिड हल्ल्यात बळी पडलेल्या महिला व बालकांना अर्थसहाय्य व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी खालीलप्रमाणे "सुधारित नवीन मनोधैर्य योजना" राज्यात या आदेशाच्या दिनांकापासून कार्यान्वीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर सुधारित नवीन मनोधैर्य योजना पूर्वलक्षीप्रभावाने लागू राहणार नाही.तथापि, सदर योजना पूर्वीच्या घटनांमध्ये मंजूरीसाठी प्रलंबित असणाऱ्या प्रकरणासाठी लागू राहील. मात्र असे असले तरी :-

अ) योजनेच्या पुर्वीच्या दि. २१.१०.२०१३ च्या निकषानुसार जिल्हा मंडळाने तपासुन अमान्य केलेल्या प्रकरणांच्या बाबतीत त्यांना अशी प्रकरण पुन्हा: उघडता येणार नाहीत.

ब) योजनेच्या पुर्वीच्या दि. २१.१०.२०१३ च्या निकषानुसार अर्थसहाय्य मंजूर करण्यात आलेल्या प्रकरणांमध्ये त्यांना नवीन निकषाप्रमाणे अर्थसहाय्याची वाढीव रक्कम देय होणार नाही. मात्र अर्थसहाय्या व्यतिरीक्त पुर्वीच्या योजनाप्रमाणे देय असणाऱ्या इतर सेवा सदरील पीडितास नवीन निकषानुसार देखील लागू राहतील.

३. यासंदर्भात मा. उच्च न्यायालयातील रिट याचिका क्र.- २१६५/२०१४ व रिट याचिका क्र.-३१२३/२०१५ मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निदेशानुसार दिनांक ३१.१२.२००९ पासूनच्या पात्र प्रकरणांसाठी सदर मनोधैर्य योजनेच्या पुर्वीच्या दि. २१.१०.२०१३ च्या निकषानुसार भुतलक्षी प्रभावाने अर्थसहाय्य मंजूर करण्याबाबत वेगळयाने धोरणात्मक निर्णय घेवून शासनामार्फत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील. तथापि सदरहु सुधारित नवीन मनोधैर्य योजनेअंतर्गत खालील गुन्हयांमधील पीडित महिला / बालकांना अर्थसहाय्य देवून त्यांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे.

1) बलात्कार :- Section ३७५ and ३७६ , ३७६ (२), ३७६ (A), ३७६ (B), ३७६ (C), ३७६ (D), ३७६ (E) of the Indian Penal Code (IPC).

2) बालकांवरील लैंगिक अत्याचार :-Section ३, ४, ५ & ६ of Protection of Children from Sexual Offences (POCSO) Act, २०१३.

3) ॲसिड हल्ला :-Sections ३२६A and ३२६B of Indian Penal Code (IPC).

4) अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम, १९५६ (Immoral Traffic (Prevention) Act 1956 (PITA) नुसार पोलीस धाडीत अटक करण्यात आलेल्या बलात्कार/ लैंगिक अत्याचार/ॲसिड हल्ल्याच्या गुन्हयांतील घटनांमधील १८ वर्षाखालील वयोगटातील पीडित अल्पवयीन मुलीचा समावेश आहे.

यासंदर्भात अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम, १९५६ (Immoral Traffic (Prevention) Act 1956 (PITA) अंतर्गत पोलीस धाडीत अटक करण्यात आलेल्या १८ वर्षावरील महिलांच्या पुनर्वसनासाठी सद्य:स्थितीत राज्यात केंद्र पुरस्कृत "उज्ज्वला" योजना कार्यान्वीत आहे .

४. सदर नवीन मनोधैर्य योजनेअंतर्गत पीडितांच्या अर्थसहाय्याच्या मागणीचे अर्ज स्विकारण्यापासून ते अर्थसहाय्य मंजूरीचे पुर्ण अधिकार हे संबंधीत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण यांचे रहातील. ही एक Single Window System असेल.

५. सदर नवीन मनोधैर्य योजनेच्या सोबत जोडलेल्या परिशिष्ठ-अ मधील निकषानुसार पीडितांस अर्थसहाय्य देताना खालीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

(i) या प्रयोजनासाठी महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्यामार्फत किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्यामार्फत " Manodhairya Assistance Account" (MAA) नावाने स्वतंत्र बॅक खाते ऊघडण्यात यावे.

(ii) राज्य शासनामार्फत दरवर्षी यासाठी महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांना निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

(iii) या प्रयोजनासाठी महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्यामार्फत किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्यामार्फत उघडण्यात आलेल्या

" Manodhairya Assistance Account" (MAA) या स्वतंत्र बँक खात्यामध्ये खाजगी कंपन्यांकडून/ संस्थांकडून CSR च्या माध्यमातून देणगीच्या स्वरूपात प्राप्त होणाऱ्या निधीचा समावेश असेल.

( iv ) जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण यासंदर्भातील खालील कागदपत्रांची सत्या-सत्यता तपासल्या शिवाय पीडितास अर्थसहाय्य मंजूर करणार नाही. :-

१) प्रथम खबरी अहवाल (FIR)

२) अधिकृत शासकीय, निमशासकीय संस्थांमधील वैद्यकीय अधिकाऱ्याने दिलेला प्राथमिक वैद्यकीय अहवाल

३) मा. न्यायाधीशांसमोर CRPC १६४ अन्वये पीडिताने दिलेला जबाब. (मात्र काही गुन्ह्यातील घटनांच्या बाबतीत सदर CRPC १६४ अन्वये सादर करावयाच्या पीडिताच्या जबाब घेण्यास मुभा देण्याचे अधिकार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण यांना असतील).

(v) याअनुषंगाने पीडितास अर्थसहाय्य मंजूर करताना घटनेची सत्यता तपासण्यासाठी अधिकची माहिती/ कागदपत्रे तसेच संबंधीत अन्य प्राधिकाऱ्यांचे मत मागविण्याचे अधिकार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण यांना राहतील.

(vi ) पीडिताच्या बाबतीत मागविण्यात आलेल्या माहितीबाबतची गोपनीयता राखण्याची जबाबदारी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण यांची राहील

(vii) पीडितास अर्थसहाय्य मंजूर करताना याबाबतच्या गुन्ह्यासंदर्भातील फौजदारी न्यायप्रकरणातील मा.न्यायालयाचे आदेश / निर्णय इत्यादीचा आधार घेवून पीडितांस अर्थसहाय्य मंजूर करता येणार नाही.

(viii) तथापि संबधीत पीडित महिलेने मा. न्यायाधीशांसमोर दिलेल्या CRPC १६४ च्या जबाबाशी तीने न्यायालयात एकनिष्ठ राहणे अपेक्षित आहे. अन्यथा यासंदर्भात पीडिताने न्यायालयात जाणीवपुर्वक जबाब फिरविल्यास / गुन्हा सिध्द न झाल्यास/दावा खोटा सिध्द झाल्यास पीडितास दिलेले अर्थसहाय्य तीच्याकडून प्रचलित जमिन महसूली कायदयाप्रमाणे वसुल करण्यात यावे.

६. सदर नवीन मनोधैर्य योजनेनुसार पीडितांस अर्थसहाय्य मंजूर करण्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे राहील.:-

१) घटनेसंदर्भातील FIR ची प्रत व अन्य कागदपत्रे संबंधीत पोलीस तपासणी अधिकारी ई-मेलव्दारे अथवा अन्य माध्यमातून १ तासाच्यां आंत संबंधीत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण तसेच संबंधित जिल्हा महिला विकास अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात येतील.

२) तदनंतर संबंधीत पीडित महिलेस वैद्यकीय व मानसिक आधार देण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या ट्रॉमा टीममार्फत त्यांना तात्काळ सेवा पुरविण्यात येतील.

३) जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्याकडे कागदपत्रे प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून सात दिवसाच्या आंत पीडितास रु ३० हजार इतकी रक्कम पीडिताच्या वैद्यकीय उपचारांसाठी तात्काळ मदत म्हणून मंजूर करण्यात यावी.

४) तद्नंतर प्रकरणाची सखोल तपासणी करुन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थि राज्य विधी सेवा प्राधिकरण १२० दिवसाच्या आत उर्वरित अर्थसहाय्याची रक्कम संबंधि पीडितास मंजूर करेल.

५) पीडितांस मंजूर करण्यात आलेल्या एकूण रक्कमेपैकी सुरुवातीस तातडीची मदत म्हणून मंर करण्यात आलेली रु.३० हजार इतकी रक्कम वजा करुन उर्वरित २५% रक्कम पीडित अथवा पीडिताच्या नातेवाईकास रोखीने अदा करण्यात येईल. तद्नंतर उर्वरित ७५% रक्च पीडिताच्या नावे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी से प्राधिकरण यांच्यामार्फत बँकेत मुदतठेव म्हणून ठेवण्यात येईल व याबाबतच्या पावतीची ३ सात दिवसाच्या आंत संबंधीत पीडितास उपलब्ध करुन देण्यात येईल.

६) सदर योजनेअंतर्गत पीडितास मंजूर करावयाच्या अर्थसहाय्याच्या रक्कमेसाठी तीच्या स्वतःच नावे KYC norms असलेले बँक खाते उघडणे बंधनकारक आहे.

७) पीडित व्यक्ती अज्ञान असेल तर त्याच्या बाबतीत पालकत्व स्विकारणाऱ्या व्यक्तीच्या नावे बँ खाते उघडण्यात यावे.

७ सदर नवीन मनोधैर्य योजनेनुसार पीडितांस दयावयाच्या अर्थसहाय्या व्यतिरीक्त पीडिताच पुनर्वसनासाठी पीडितांस खालील प्रकारच्या सेवा संबधित जिल्हा महिला व बाल विकास अधिक यांच्यामार्फत पुरविण्यात याव्यात :-

१) सदर योजनेअंतर्गत पीडित महिला / बालकास सर्व शासकीय, निमशासकीय, नगरपालिक महानगरपालिका, खाजगी रूग्णालयात मोफत वैद्यकीय सेवा पुरविण्यात येईल.

२) सदर दुर्दैवी घटनांमधील HIV / AIDS बाधीत महिलांना / बालकांना आवश्यक त्या स वैद्यकीय सुविधा उपरोक्त शासकीय, निमशासकीय रूग्णालयात मोफत पुरविण्यात येतील.

३) याशिवाय सदर पीडित महिलेस वैद्यकीय व मानसिक आधार देण्यासाठी गठीत करण्या आलेल्या प्रशिक्षित ट्रॉमा टीममार्फत त्यांना समुपदेशन / कायदेशीर इ.सेवा विनामुल पुरविण्यात येतील.

४) तसेच सदर पीडित महिलेस नोकरी / व्यावसायिक प्रशिक्षण देवून तिचे पुनर्वसन करण्या यावे.

८. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१८०१०५१७४०३६३०३० असा आहे. सदरचा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Lalsing Ramchandra Gujar

(ला. रा. गुजर)

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा.राज्यपाल, यांचे सचिव,राजभवन,मुंबई

२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई

३) मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई .

४) मा.सभापती/उपसभापती विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई

५) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा/ विधानपरिषद ,महाराष्ट्र विधीमंडळ मुंबई.

६) मा.सदस्य , विधानसभा / विधानपरिषद, विधानमंडळ, महाराष्ट्र विधानमंडळ मुंबई

७) मा.मंत्री (म व बा वि)/ राज्यमंत्री(म व बा वि) याचे खाजगी सचिव ,मंत्रालय ,मुंबई आवश्यक व विभाग

८) अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग, , मंत्रालय, मुंबई

९) महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई.

१०) आयुक्त, महिला व बाल विकास

११) आयुक्त, एकात्मिक बाल विकास योजना

१२) सर्व उपसचिव ,सर्व अवर सचिव, महिला व बाल विकास, नवीन प्रशासकीय भवन , मुंबई

१३) उपायुक्त (बालविकास) महिला व बाल विकास आयुक्तालय, म.रा.पुणे.

१४) सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.

१५) सर्व जिल्हाधिकारी.

१६) सर्व कार्यासने, महिला व बाल विकास विभाग, नवीन प्रशासकीय भवन , मुंबई

१७) निवड नस्ती का २.

शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण-२०१७/प्र.क्र.२५५/का-२, दिनांक ३० /१२/२०१७ सोबतचे सहपत्र

परिशिष्ट-अ

सुधारित मनोधैर्य योजनेअंतर्गत पीडितांना मंजूर करावयाच्या अर्थसहाय्याचा तपशिल.

| अ.क्र. | घटनेची विवरण | अर्थसहाय्य | शेरा |
|---|---|---|---|
| १ | बलात्कार :- | | |
| | अ) घटनेचा परिणाम स्वरुप मानसिक धक्का बसून महिलेस कायमचे मतिमंदत्व/ शारीरिक अपंगत्व आले असेल, तर | रु.१०,००,०००/- पर्यंत | मंजूर रक्कमेपैकी ७५ % रक्कम १० वर्षासाठी पीडिताच्या नावे बँकेत मुदतठेव म्हणून ठेवण्यात येईल. तर २५% रक्कमेचा धनादेश पीडितास तात्काळ अदा करण्यात येईल. (यामध्ये वैद्यकीय खर्चासाठी रु.३० हजार इतक्या रक्कमेचा समावेश आहे.) |
| | आ) सामुहिक बलात्कार व अशा प्रकरणी महिलेस गंभीर व तीव्र स्वरुपाची शारीरिक इजा झाली असेल, तर | रु.१०,००,०००/- पर्यंत | वरीलप्रमाणे |
| | इ) बलात्काराच्या घटनेमुळे महिलेचा मृत्यू झाल्यास, | | |
| | १) मयत महिला कुटुंबातील कमावती महिला असेल तर | रु.१०,००,०००/- पर्यंत | वरीलप्रमाणे |
| | २) मयत झालेली महिला कुटुंबातील कमावती महिला नसेल तर. | रु १०,००,०००/- पर्यंत | वरीलप्रमाणे |
| | ई) बलात्काराच्या गुन्ह्यातील अन्य घटनांमधील पीडित महिला असेल तर | रु.३,००,०००/- पर्यंत | वरीलप्रमाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | POCSOअंतर्गत बालकांवरील लैंगिक अत्याचार :-<br>अ) घटनेमध्ये पीडित बालकास लिंगभेद न करता कायमस्वरुपी मतिमंदत्व किंवा अपंगत्व आल्यास | रु.१०,००,०००/- पर्यंत | मंजूर रकमेपैकी (७५ % रक्कम १० वर्षांसाठी पीडिताच्या नावे बँकेत मुदतठेव म्हणून [illegible] येईल, तर २५% रकमेचा [illegible] तात्काळ अदा करण्यात येईल. [illegible] खर्चासाठी रु.३० हजार इतक्या रकमेचा [illegible] आहे.) |
| | आ) बालकांवरील लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यातील अन्य घटनांमधील पीडित महिला असेल तर | रु.३,००,०००/- पर्यंत | वरीलप्रमाणे |
| ३ | ॲसिड हल्ला :-<br>अ)घटनेमध्ये पिडित महिला / बालकाचा चेहरा विद्रुप झाल्यास, शरिराच्या कोणत्याही दृष्य भागाची हानी झाल्यास, कायमचे अपंगत्व आल्यास | रु.१०,००,०००/ पर्यंत | मंजूर रकमेपैकी [illegible] पीडिताच्या नावे बँकेत मुदतठेव [illegible] येईल, तर २५% रकमेचा [illegible] तात्काळ अदा करण्यात येईल. [illegible] खर्चासाठी रु.३० हजार इतक्या रकमेचा [illegible] आहे.) |
| | आ) ॲसिड हल्ल्याच्या गुन्ह्यातील अन्य घटनांमधील पीडित महिला असेल तर | रु.३,००,०००/- पर्यंत | वरीलप्रमाणे |

**बलात्कार (Rape) / बालकांवरील लैंगिक अत्याचार (Sexual Assualt) व ॲसिड हल्ला (Acid Attack) यामध्ये बळी पडलेल्या महिला आणि बालकांना अर्थसहाय्य व पुनर्वसन करण्यासाठी राज्यात सुधारित "मनोधैर्य योजना" कार्यान्वित करण्याबाबत......**

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन शुद्धिपत्रक क्र. संकीर्ण -२०१७/प्र.क्र. २५५ /का-२,
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १६ फेब्रुवारी, २०१८.

**संदर्भ-** १) महिला व बाल विकास विभागाच्या शासन निर्णय, क्र.संकीर्ण-२०१७ / प्र.क्र. २५५/ का-२, दिनांक ३० डिसेंबर, २०१७.

२) शासन शुध्दिपत्रक क्र.संकीर्ण-२०१७ / प्र.क्र. २५५/ का-२, दिनांक ८ फेब्रुवारी, २०१८.

शुध्दिपत्रक :-

महिला व बाल विकास विभागाच्या संदर्भाधीन दिनांक ३० डिसेंबर, २०१७ च्या आदेशान्वये राज्यात कार्यान्वीत करण्यात आलेल्या सुधारित नवीन मनोधैर्य योजनेच्या आदेशातील परिच्छेद-४ मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या समितीने सादर केलेल्या Model Scheme प्रमाणे सुधारणा करण्यात येत असून सदरचा परिच्छेद सुधारित स्वरूपात खालीलप्रमाणे वाचण्यात यावा :-

"सदर नवीन मनोधैर्य योजनेअंतर्गत पीडितांच्या अर्थसहाय्याच्या मागणीचे अर्ज स्वीकारण्याचे, पीडितांच्या अर्थसहाय्याच्या दाव्यावर निर्णय घेऊन पीडितांस देय असणाऱ्या रक्कमांचे वाटप करण्याचे पूर्ण अधिकार महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांना प्रदान करण्यात येत आहेत. यासाठी महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्याकडून योग्य ती अधिसूचना / विनियम / मार्गदर्शक सूचना जारी करून त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचे प्रत्यावर्तन त्याना जिल्हास्तरावरील संबंधीत सर्व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणांकडे सोपविता येतील. ही एक Single Window System असेल."

२. या अनुषंगाने या विभागाचे संदर्भाधिन दि.८/२/२०१८ चे शुध्दिपत्रक रद्द करण्यात येत आहे.

३. सदर शासन शुध्दिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१८०२१६१३३५४५९४३० असा आहे. सदरचे शासन शुध्दिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Smita Dattatray Nivatkar

(स्मिता निवतकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा.राज्यपाल, यांचे सचिव,राजभवन,मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई .
3) मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई .

४) मा.सभापती/उपसभापती विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
५) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा/ विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
६) मा.सदस्य, विधानसभा / विधानपरिषद, विधानमंडळ, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
७) मा.मंत्री (म व बा वि)/ राज्यमंत्री (म व बा वि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई [illegible]
८) अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
९) महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई
१०) आयुक्त, महिला व बाल विकास
११) आयुक्त, एकात्मिक बाल विकास योजना
१२) सर्व उपसचिव, सर्व अवर सचिव, महिला व बाल विकास, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई
१३) उपायुक्त (बालविकास) महिला व बाल विकास आयुक्तालय, म.रा.पुणे.
१४) सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.
१५) सर्व जिल्हाधिकारी.
१६) सर्व कार्यासने, महिला व बाल विकास विभाग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई
१७) निवड नस्ती का-२.

**" One Stop Centre " या योजनेअंतर्गत राज्यात कार्यरत केंद्रांमध्ये आदर्श कार्यपध्दती लागू करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : बैठक-२०१७/प्र.क्र.२०९/का-२,**

नवीन प्रशासकीय इमारत, ३रा मजला,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २८ ऑगस्ट,२०१९.

संदर्भ :-१.शासन निर्णय,महिला व बालविकास विभाग,क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.९५/का-२, दिनांक १ फेब्रुवारी, २०१६.

२.शासन निर्णय,महिला व बाल विकास विभाग,क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.२२२/का-२, दिनांक २३ मार्च २०१८.

३. केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाने " One Stop Centre " चे कामकाज चालविणा-या केंद्र प्रमुख,व्यक्तीविशिष्ट कार्यकर्ता,डॉक्टर,/आरोग्य अधिकारी, पोलिस सहायक अधिकारी, कायदेविषयक सहाय्यक/वकील (Center Administrator,Case Worker, Doctor/Health Worker, Police Facilitation Officer, Legal aid Lawyer) यांच्यासाठी तयार केलेली आदर्श कार्यपध्दती.(Standard Operating Procedures)

४. मा.सर्वोच्च न्यायालय रीट याचिका(सिव्हील) क्र.५६५/२०१२,निपुण सक्सेना विरूध्द केंद्र शासन व इतर या प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाचे दिनांक ३१ जुलै,२०१९ चे आदेश.

प्रस्तावना

संकटग्रस्त महिलांना तातडीने मदत मिळण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास [illegible] " One Stop Centre " ही योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे. त्यानुसार राज्यातील [illegible] " One Stop Centre " सुरु करण्यात आले आहे. या One Stop Centre मध्ये कौटुंबिक [illegible], लैंगिक शोषणाच्या पीडित, मानवी वाहतुकीस बळी पडलेल्या, ॲसिड हल्ल्यातील पीडित महिलांस वैद्यकीय सुविधा, पोलीस मदतकेंद्र, समुपदेशन केंद्र व कायदेशीर मदत इत्यादी सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. " One Stop Centre " योजना यशस्वीपणे राबविणेसाठी केंद्र शासनाने डिसेंबर २०१७ मध्ये मार्गदर्शक सूचना(Guidelines) तयार केलेल्या असून त्यानुसार राज्यातील केंद्रांचे कामकाज सुरु आहे. सदरील मार्गदर्शक सूचना www.wcd.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

मा.सर्वोच्च न्यायालयाने उपरोक्त संदर्भीय क्र ४ अन्वये दिनांक ३१ जुलै,२०१९ रोजी पारित केलेले आदेश पुढीलप्रमाणे आहेत-

"We direct all the States and the Union Territories to adopt the format and protocol of [illegible] Material for Standard Operating Procedures (SoPs) by the Ministry of [illegible] and Child Development as published in the month of January २०१७."

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार उपरोक्त संदर्भीय क्र.३ अन्वये केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाने " One Stop Centre " चे कामकाजासाठी तयार केलेली आदर्श कार्यपध्दती(SoPs) नुसार काम करण्याच्या सूचना क्षेत्रीय अधिका-यांना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक:-**

वरील पार्श्वभूमीवर केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाने "One Stop Centre चे कामकाज चालविणा-या केंद्र प्रमुख, व्यक्तीविशिष्ट कार्यकर्ता,डॉक्टर,/आरोग्य अधिकारी, पोलिस सहायक अधिकारी, कायदेविषयक सहाय्यक/वकील (Center Administrator,Case Worker, Doctor/Health Worker, Police Facilitation Officer, Legal aid Lawyer) यांच्यासाठी तयार केलेल्या आदर्श कार्यपध्दती नुसार कामकाज करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत. यापुढे सदरील आदर्श कार्यपध्दतीनुसार "One Stop Centre "चे कामकाज चालविण्याची जबाबदारी संबंधीत जिल्हाधिकारी व जिल्हा महिला [illegible] अधिकारी यांची राहील. त्यानुसार सदरील आदर्श कार्यपध्दतीनुसार "One Stop Centre" [illegible] होणा-या पीडित महिलेस आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. [illegible] कार्यपध्दतीची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची दक्षता सर्व संबंधीत घटकांनी [illegible] कार्यपध्दती सोबत जोडण्यात आली आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या [illegible] उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०८२८१३०५३५०८३० असा [illegible] डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Smita Dattatray Nivatkar

(स्मिता निवतकर)

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुबई.

३. मा.मंत्री, नियोजन / वित्त विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

४. मा.मंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

५. मा.राज्यमंत्री, महिला व बाल विकास विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

६. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य

७. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

८. आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई.

९. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१०. सर्व जिल्हाधिकारी

११. सर्व विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास विभाग,

१२. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,

१३. निवड नस्ती/का-२.

# परिशिष्ट - "ब"

महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीची (Committee on Rights and Welfare of Women and Child) बैठक बुधवार, दिनांक २५ ऑगस्ट, २०२१ रोजी ११:००:०० वाजता कक्ष क्रमांक २००३, विसावा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :-

**उपस्थिती**

(१) श्रीमती सरोज आहिरे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्रीमती यामिनी यशवंत जाधव, वि.स.स.

(३) श्रीमती लता चंद्रकांत सोनवणे, वि.स.स.

(४) श्रीमती सुमनताई आर. आर. पाटील, वि.स.स.

(५) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.

(६) श्रीमती नमिता मुंदडा, वि.स.स.

(७) श्रीमती गीता जैन, वि.स.स.

(८) श्रीमती मंजुळा गावीत, वि.स.स.

(९) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री.विजय कोमटवार, अवर सचिव

**उपस्थित अधिकारी :**

(१) श्री.नि.प्र.धोटे, प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग

(२) श्रीमती आय.ए.कुंदन, प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग

(३) श्रीमती श्रद्धा जोशी, व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ.

(४) श्री.राहुल मोरे, आयुक्त, महिला व बालविकास विभाग

(५) श्री.जी.व्ही.देवरे, उपआयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा आयुक्तालय.

(६) श्रीमती सुप्रिया श्री.धावरे, उप सचिव, उप प्रारुपकार निंबधक

(७) श्री.महेंद्र शितोळे, अवर सचिव, महाराष्ट्र विधि सेवा प्राधिकरण

(८) श्री.महेश वरुडकर, अवर सचिव, महिला व बालविकास विभाग

(९) श्री.राजेंद्र भालवणे, अवर सचिव, विधि व न्याय विभाग

---

समितीने मनोधैर्य योजनेबाबत प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग व प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग यांची साक्ष घेतली.

महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीची बैठक बुधवार, दिनांक २३ मार्च, २०२२ रोजी दुपारी २.३० वाजता कक्ष क्रमांक १९०२, १९ वा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते :-

**उपस्थिती**

(१) श्रीमती सरोज आहिरे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्रीमती लता चंद्रकांत सोनवणे, वि.स.स.

(३) श्रीमती सुमनताई आर. आर. पाटील, वि.स.स.

(४) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.

(५) श्रीमती नमिता मुंदडा, वि.स.स.

(६) श्रीमती गीता जैन, वि.स.स.

(७) श्रीमती मंजुळा गावीत, वि.स.स.

(८) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री.विजय कोमटवार, अवर सचिव

(२) श्री.मधुकर भडेकर, कक्ष अधिकारी.

समितीने उक्त बैठकीत मनोधैर्य योजनेबाबत पहिल्या प्रारुप अहवालावर विचारविनिमय करून तो संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई